cmyk

## संपादकीय

### निवडणूक एक मात्र अर्थ अनेक

राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, कोल्हापूर आणि नाशिकसह बहुसंख्य महापालिकांवर भारतीय जनता पक्षाने वर्चस्व मिळवले. आठ वर्षांनी झालेल्या या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले होते. महापालिकांवर सत्ता मिळवण्यासाठी सगळ्याच पक्षांनी जंग जंग पछाडले होते.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२६१ | रविवार दि.१८ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### पैसे न मिळाल्याने 'लाडकी'चा संताप

भंडारा : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचा हप्ता वर्ग करण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात अजूनही हे पैसे जमा झालेले नाहीत. या पार्श्वभूमीवर महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. भंडारा शहरातील नागपूर नाका परिसरात महिलांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केल्यामुळे दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही वेळातच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला. अचानक झालेल्या या चक्का जाम आंदोलनामुळे महामार्गावरून जाणा-या अवजड वाहनांसह खासगी वाहनेही अडकून पडली होती. यामुळे प्रशासनाची धावपळ उडाल्याचे पाहायला मिळाले.

### पंतप्रधान पिक विमा योजनेत कॉफी पिकाचा समावेश करा

दिल्ली: कॉफी पिकाचा पंतप्रधान पीक विम योजनेत समावेश करावा, अशी मागणी काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. प्रतिकुल हवामानात कॉफी पिकाला फटका बसतो. त्यामुळे पिक विमा योजनेत कॉफीचा समावेश केला तर कॉफी उत्पादकांना दिलासा मिळेल, याकडे खासदार गांधी यांनी पत्रात लक्ष वेधले आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांना लिहिलेल्या या पत्रात कॉफी उत्पादकांच्या समस्या मांडल्या आहेत. मंत्री गोयल यांना लिहिलेल्या पत्रात प्रियंका म्हणाल्या की, मतदारसंघातील वायनाडमधील शेतकऱ्यांनी त्यांच्या कॉफीच्या गुणवत्तेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा मिळवली आहे. परंतु त्यांच्या शेतजमिनी डोंगराळ भागात असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो.'' असेही त्यांनी पत्रात लिहिले आहे.

### ६ नगरसेवक सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील - राज ठाकरे

मुंबई: मिनी विधानसभा समजल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मनसेला अपेक्षित यश मिळाले नाही. फक्त ६ जागांवर राज ठाकरे यांना समाधान मानावे लागले आहे. यावर मनसेचे प्रमुख अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत निकालावर भाष्य केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला यावेळेस अपेक्षित यश मिळाले नसल्याचे दुःख आहे, पण म्हणून खचून जाणाऱ्यातले आपण नाही. आपले जे नगरसेवक निवडून आले आहेत ते तिथल्या तिथल्या सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील. आणि मराठी माणसाच्या विरोधात काही होत आहे असे दिसले तर त्या सत्ताधाऱ्यांना जेरीस आणतील हे नक्की, असा विश्वास राज ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. निवडणुका येतील-जातील पण आपला श्वास हा मराठी आहे हे विसरायचे नाही. लवकरच भेटूया. पुन्हा कामाला लागूया. नव्याने आपला पक्ष आणि संघटना उभारूया! अशा शब्दांत राज ठाकरेंनी मनसैनिकांना बळ दिले आहे.

### जेईई मेन परीक्षेचे प्रवेशपत्र जारी

दिल्ली: राष्ट्रीय चाचणी संस्थेने (एनटीए) शनिवारी १७ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) मुख्य २०२६ सत्र १ परीक्षेचे प्रवेशपत्र जारी केले आहे. परीक्षेसाठी नोंदणी केलेले आणि प्रवेशपत्र जारी होण्याची वाट पाहणारे उमेदवार आता अधिकृत पोर्टलवर जाऊन त्यांचे हॉल तिकीट डाउनलोड करू शकतात. तसेच, प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी, उमेदवारांना त्यांचा अर्ज क्रमांक, पासवर्ड आणि सिक्योरिटी पिन टाकावा लागेल. जर उमेदवारांनी त्यांच्या जेईई मेन प्रवेशपत्रात काही त्रुटी आढळल्यास, तत्काळ याबाबत एनटीएला कळवावे. असे न केल्यास नंतर त्यांना अडचण उद्भवू शकते. तसेच असेही सांगितले गेले आहे की, जेईई मेन प्रवेशपत्र २०२६ जारी झाल्यानंतर एनटीए जेईई वेबसाइट क्रॅश होऊ शकते. अशावेळी, कृपया थोडी वाट पाहावी, वेबसाईट रिफ्रेश करावी आणि पुन्हा प्रयत्न करावेत, असे सुचित करण्यात आले आहे.

# कापसाचे दर पडण्याच्या भितीने शेतकरी चिंतेत !

## सीएआय कापसाची विक्री करणार; कापूस उत्पादन वाढण्याचाही अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**कापसाचे भाव वाढत असतानाच कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) देशातील कापूस उत्पादन आणि वापराच्या अंदाजात वाढ केली आहे. तर कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) खरेदी केलेला कापूस १९ जानेवारीपासून विकण्याच्या तयारीत आहे. यामुळे कापसाच्या दरावर काही प्रमाणात चढ-उतार दिसू शकतात, असा अभ्यासकांचा अंदाज आहे.**

'सीएआय'ने जानेवारीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात कापूस उत्पादन ३१७ लाख गाठी राहणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. डिसेंबरमधील अहवालात ३०९ लाख ५० हजार गाठी उत्पादनाचा अंदाज देण्यात आला होता. 'सीएआय'ने महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक आणि तमिळनाडूत उत्पादन वाढल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्राच्या कापूस उत्पादनाच्या अंदाजात ३ लाख गाठी, ◀◀ पान २ वर



### तर कापसाच्या दरावर परिणाम होणार

'सीएआय'च्या कापूस उत्पादनाच्या अंदाजातील वाढीपेक्षा 'सीसीआय'ची कापूस विक्री हा घटक बाजारात निर्णायक ठरेल. 'सीसीआय'ने कमी भावात कापूस बाजारात आणला तर कापसाच्या दरावर परिणाम होईल; पण आजघडीला तशी शक्यता कमी असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. 'सीसीआय'ने जवळपास ७५ लाख गाठी कापूस खरेदी केल्याची माहिती आहे. सीसीआय कापूस विक्रीचा भाव घटवण्याची शक्यता नाही. कारण यंदाच्या हंगामात आतापर्यंतचा अनुभव पाहता खुल्या बाजारात भाव वाढले तसे 'सीसीआय'नेही कापूस विक्रीचे भाव वाढवले आहेत. 'सीसीआय'ने हेच धोरण कायम ठेवल्यास बाजाराला आधार मिळेल, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

### आयात जास्त, निर्यात घटणार

'सीएआय'ने कापूस आयातीचा अंदाज विक्रमी ५० लाख गाठींवर कायम ठेवला आहे. तर निर्यातीचा अंदाज ३ लाख गाठींनी कमी केला आहे. निर्यात यंदा १५ लाख गाठींवरच स्थिरावेल, असे अहवालात म्हटले आहे. विशेष म्हणजे देशात शिल्लक साठा १०७ लाख गाठी राहण्याची शक्यता असतानाही निर्यात कमी होण्याचा अंदाज देण्यात आला आहे. 'सीएआय'ने दिलेल्या माहितीनुसार, देशात ३१ डिसेंबरपर्यंत ३१ लाख गाठी कापूस आयात झाला आहे. ३१ डिसेंबरपर्यंत शुल्कमुक्त आयातीला परवानगी होती. त्यामुळे आयात वाढली. १ जानेवारीपासून ११ टक्के आयात शुल्क लागू झाले आहे. त्यामुळे पुढील ९ महिन्यांत १९ लाख गाठी कापूस आयात होऊ शकतो, असा अंदाज बांधण्यात आला आहे.

# मुंबईत अडीच-अडीच वर्षाचा फॉर्म्युला?

## शिंदेंची सेना थेट ५ स्टार हॉटेलमध्ये, दावे प्रतिदावे करण्यास सुरूवात



मुंबई । प्रतिनिधी

मुंबईत अडीच-अडीच वर्षे महापौर पद विभागून द्यावे, अशी मागणी आता शिंदे सेनेच्या नगरसेवकांनी आणि नेत्यांनी केली आहे. २३ जानेवारीपासून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत असून, या विशेष वर्षात शिवसेनेचा महापौर असावा, अशी इच्छा या नेत्यांनी व्यक्त केली आहे.

### सर्व मनपाची आरक्षण सोडत निघाल्यानंतरच महापौर

आरक्षण सोडत निघाल्यानंतरच महापौर पदाचा चेहरा ठरणार आहे. पुढील आठवड्यात नगर विकास खाते महापौर सोडत काढणार असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. तर जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेष म्हणजे राज्यातील निवडणुकीच्या इतिहासात महापौर आरक्षणाची सोडत न होता निवडणूक होण्याची ही पहिलीच वेळ होती. साधारणपणे महापालिका निवडणुकांपूर्वी किंवा प्रभाग रचनेदरम्यानच महापौरपदाचे आरक्षण जाहिर केले जाते. मात्र, यावेळी अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. आरक्षण जाहिर न होण्यामागे ओबीसी आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयात असलेला तिढा हे कारण प्रशासनाकडून दिले जात आहे. जोपर्यंत न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत आरक्षण निश्चित करणे कठीण असल्याचे बोलले जात आहे. मात्र आता यावर लवकरच तोडगा निघण्याची शक्यता आहे.

शिवसेनेचे सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी यापूर्वी एका मुलाखतीत नमूद केल्यानुसार, प्रत्येक वेळी भाजपच्या मदतीनेच शिवसेनेचा महापौर पदावर बसला आहे; त्यामुळे या वेळीही तशीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर, ◀◀ पान २ वर

# पोलिस व्हॅनला अपघात

## ज्ञानराधाचे कुटे दाम्पत्य जखमी



बीड । प्रतिनिधी

**ज्ञानराधा मल्टीस्टेट बँक घोटाळा प्रकरणात अटकेत असलेले मुख्य आरोपी सुरेश कुटे आणि त्यांची पत्नी अर्चना कुटे यांना केज येथून बीड येथे पोलिसांच्या ताब्यात घेऊन येत असताना भीषण अपघात झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. यात या दोघेही जखमी झाल्याचे समोर आले आहे.**

नेकनूर - येळंब रस्त्यावर सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास पोलिसांच्या व्हॅनची एका मोटरसायकलशी समोरासमोर धडक झाली. या अपघातात मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला असून, त्याचा पाय अक्षरशः तुटल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. अपघात इतका भीषण होता की मोटरसायकलचे मोठ्या प्रमाणावर ◀◀ पान २ वर

# माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

## मुंजा गित्ते जमीन खरेदी खटला पुनरुज्जीवित करण्यास स्थगिती

अंबाजोगाई प्रतिनिधी

**जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे.**



न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील अॅड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे. २०११-१२ साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होतीश. तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर ◀◀ पान २ वर

# बीडमध्ये जीएसटी अधिकाऱ्याचा संशयास्पद मृतदेह आढळला

## काही दिवसापासून जाधवर होते तणावाखाली

बीड प्रतिनिधी

**बीड शहरात जीएसटी विभागातील एका अधिकाऱ्याचा मृतदेह एका चारचाकी वाहनात आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कपीलधार रस्त्यावरील देवस्थानच्या कमानीजवळ ही घटना उघडकीस आली.**



सचिन नारायण जाधवर असे मृत अधिकाऱ्याचे नाव असून, गेल्या काही दिवसापासून ते तणावाखाली वावरत होते. ते शुक्रवार पासून बेपत्ता होते. रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने शनिवारी सकाळी त्यांच्या पत्नीने बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, शनिवारी दुपारी कपीलधार रस्त्यावर एका चारचाकी वाहनात सचिन जाधवर यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस तसेच फॉरेन्सिक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचा पंचनामा केला असून, धुळे - सोलापूर हायवेच्या खालच्या बाजूला कपिलधार कमानी जवळ त्यांची चार चाकी गाडी आणि त्यांचा मृतदेह सापडला. या ठिकाणी काही संशयास्पद बाबीही आढळून आल्या. गाडीच्या खाली आणि गाडीत एक मडके ठेवलेले होते त्यात कोळशे पेटवून त्याचा धूर ◀◀ पान २ वर

### दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र

**बारामती:** कृषी २०२६ प्रदर्शनाच्या निमित्ताने दोन्ही राष्ट्रवादीतील प्रमुख नेते शनिवारी बारामतीत आहेत. या नेते मंडळींनी एकत्रितपणे कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी एकत्रितपणे लढणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,३०० | ६,६०० | २,९७३ |
| ज्वारी/हायब्रिड : ५.५० क्विंटल | २,६०० | ४,७०० | ३,४८८ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर :७४.५० क्विंटल | ६,००० | ७,३०१ | ६,९६५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | २,५०१ | ६,५०० | ५,०८८ |
| बाजरी: १३.०० क्विंटल | २,४४१ | २,८३० | २,६३५ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| सोयाबीन: २७.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |




# शिवशक्तीने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला!

## उद्धव ठाकरे यांची भाजपावर घणाघाती टीका

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईमध्ये आमचा महापौर व्हावा, अशी आमची इच्छा होती आणि आजही आहे. तो आकडा आम्ही आज गाठू शकलेलो नाही, पण सत्ताधाऱ्यांच्या खेळाला उत्तर देऊन जे काही यश शिवशक्तीने मिळवले आहे, त्याने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला आहे. त्यांनी एक्झिट पोलचे आकडे असोत किंवा इतर प्रयत्न, शिवसेना नामोहरम करण्यासाठी एकही कसर सोडली नाही, अशा शब्दांमध्ये शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी (दि. १७) पत्रकार परिषदेत मुंबई महानगरपालिका निवडणूक निकालावर भाष्य केले.



सत्ताधाऱ्यांच्या खेळाला उत्तर देऊन जे काही यश शिवशक्तीने मिळवले आहे, त्याने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला आहे. भाजपने कागदावर शिवसेना संपवली असेल; पण जमिनीवरची शिवसेना ते संपवू शकत नाहीत. हे महापालिका निकालांनी दाखवून दिले आहे. भाजप ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# निवडणूक एक मात्र अर्थ अनेक

राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, कोल्हापूर आणि नाशिकसह बहुसंख्य महापालिकांवर भारतीय जनता पक्षाने वर्चस्व मिळवले. आठ वर्षांनी झालेल्या या निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले होते. महापालिकांवर सत्ता मिळवण्यासाठी सगळ्याच पक्षांनी जंग जंग पछाडले होते. या निवडणुकांच्या निमित्ताने झालेले राजकीय संक्रमण मतदारांच्या मनात कमालीचा संभ्रम निर्माण करेल. प्रमुख राजकीय पक्षांचे तुकडे झाले. युत्या आणि आघाड्या फुटल्या. भारतीय जनता पक्ष या सगळ्याला अपवाद ठरला तरी अंतर्गत धुसफूस उघड झाली होती. आयाराम-गयारामांमुळे पक्ष टीकेचा धनी बनलेला आढळला. वॉशिंग मशीन असेही या पक्षाला हिणवले गेले. युतीचा धर्म भाजपने पाळला नाही. युतीतील पक्षांच्या कार्यकर्त्यांना आपलेसे केले. यामुळे मतदार या पक्षावर नाराज आहेत असे अनेक तर्क निवडणूकपूर्व मांडले गेले.

तथापि, हे सगळे तर्क मतदारांनी काही अंशी खोटे ठरवले. मतदारांनी त्यांचे मतदान भाजपच्या पारड्यात भरभरून टाकले. केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवर एकाच पक्षाची सत्ता असली तर ते विकासाला पूरक ठरेल, असा विचार मतदारांनी केलेला असू शकेल. या निवडणुकीत मराठीचा मुद्दा गाजला. उबाठा आणि मनसेना यांनी तो आक्रमकपणे लावून धरला. त्यांची ही भूमिकाही भाजपच्या विजयाला पूरक ठरली असावी. याच आक्रमकतेमुळे उत्तर भारतीय-परप्रांतीय मतदार मोठ्या संख्येने भाजपकडे वळला असावा. तरीही मुंबईचा महापौर मराठीच होणार ही भाजप प्रवक्त्यांची प्रतिक्रिया हा त्याचाच परिपाक आणि मराठी माणसाच्या रेट्याचा परिणाम आहे हे मात्र नक्की. आरोप-प्रत्यारोपांच्या चिखलफेकीतही मतदारांच्या मनातील पक्ष प्रतिमा कायम राखण्यात भाजपला यश आले. याव्यतिरिक्त पक्षाचा निवडणुकीकडे बघण्याचा दृष्टिकोन, रणनीतीची आखणी, प्रचाराचे सूक्ष्म नियोजन, बंडोबांना थंडोबा करण्याची आखणी याचाही या विजयात मोठाच हातभार आहे हे आता विरोधी पक्षांनाही मान्य करावे लागेल. अत्यंत छोट्या पातळीवरची निवडणूक पक्ष तितक्याच गंभीरपणे लढवतो. काँग्रेससह अन्य पक्ष जेव्हा महानगरपालिका निवडणुकीच्या नियोजनात रस घ्यायला लागले तेव्हा भाजपने त्यांच्या स्टार प्रचारकांनी यादीदेखील जाहीर करून टाकली होती. एका निवडणुकीतील विजय साजरा करताना पक्षपातळीवर पुढच्या निवडणुकीची तयारी सुरू असते असे राजकीय विश्लेषक म्हणतात. त्यातील तथ्य या विजयाने ठसठशीत केले. अनेक प्रकारची अनुकूलता असूनही शिंदेसेनेला मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. त्याउलट, उबाठाने मुंबई महापालिकेतील सत्ता गमावली असली तरी लढत मात्र चांगलीच दिली. काही ठिकाणी बाजीही मारली. युतीतील पक्षांनी उद्धव ठाकरे यांची कोंडी करण्याची एकसुद्धा संधी सोडली नाही. पण उद्धव ठाकरे हतोत्साहित झाले नाहीत. ठाकरे बंधू एकत्र येण्याचा मनसेनेला किती फायदा झाला हा संशोधनाचा विषय ठरू शकेल. पण ऐन निवडणुकीच्या धामधूमीत सेना-मनसेना युतीचा उद्धव ठाकरे यांना थोडाफार फायदा झाला असू शकेल. त्यांनी एकत्र येण्याचे धाडस दाखवले तेही कौतुकास पात्र ठरले. कारण ते एकत्र येण्याचे दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांनी उत्साहात स्वागत केले होते. ते वजन उबाठाच्या पारड्यात पडले असू शकेल. आगामी काळात विरोधी पक्ष म्हणून हाच आक्रमकपणा त्यांनी कायम ठेवावा, अशीच कार्यकर्त्यांची इच्छा असणार. एकेकाळी राज्याचे मुख्यमंत्री ठरवणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे नेमके काय सुरू आहे हे त्यांचे प्रमुख कार्यकर्तेसुद्धा सांगू शकणार नाहीत कदाचित. पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवारांनी खूप गवगवा केला. भाजपशी पंगाही घेतला. पण या दोन्हींसह अन्य ठिकाणी त्यांचाही फार प्रभाव दिसला नाही. काँग्रेस पक्षाचा उल्लेख अपरिहार्य ठरू शकेल. त्यांच्याही पारड्यात काही नगरसेवकांचे दान मतदारांनी टाकले.

वास्तविक, काँग्रेसने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली खरी, पण पुढे फारशा हालचाली आढळल्या नाहीत. केंद्रीय-राज्यपातळीवरील प्रमुख नेत्यांनी दौरे केले, असेही मतदारांच्या अनुभवास फारसे आले नाही. तरीही या पक्षाचे ज्येष्ठ मतदारांच्या मनात स्थान आहे. मध्यममार्गी लोकांना अजूनही काँग्रेसकडून आशा आहेत, असाच याचा अर्थ आहे. काँग्रेसकडे एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणूनच बघितले जाते. यातील मर्म काँग्रेसधुरिण लक्षात घेतील का? तात्पर्य, या निवडणुकांमध्ये सगळ्या पक्षांनी आपापली संस्थाने राखण्याचा प्रयत्न केला. त्यात भाजपला लक्षणीय यश मिळाले तर मनसेना, शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची अस्तित्वशून्य होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली असावी, असेही म्हटले जाऊ शकेल.

**श्रीराम कथेच्या आयोजनातून आ.सुरेश धस यांनी देव देश आणि धर्म कार्य करण्याची प्रेरणा निर्माण केली-महंत मंदार महाराज रामदास**

# धार्मिक ज्ञानयज्ञाचे यापुढेही कार्यक्रम घेत राहणार-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी येथे प्रभू श्री रामचंद्र संगीत श्री राम कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करून मुख्य संयोजक आमदार सुरेश धस यांनी आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील नागरिकांना देश, देव आणि धर्मकार्य करण्याची प्रेरणा या राम कथेच्या आयोजनातून निर्माण केली आहे. याही पुढील कालावधीमध्ये याहीपेक्षा भव्य दिव्य धार्मिक अध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन व्हावे आम्ही सर्व संत मंडळी या कामी आमदार सुरेश धस यांच्या पाठीशी उभे राहू अशी ग्वाही दादेगाव येथील देवदास स्वामी मठाचे महंत मंदार महाराज रामदासी यांनी दिली.**

आष्टी येथील संगीत राम कथा ज्ञान यज्ञ सोहळ्यामध्ये सांगता समारंभामध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले आष्टी येथील राम कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजनामध्ये अल्प कालावधी असून देखील भव्य दिव्य तयारी करण्यात आली आमदार सुरेश धस यांचे कल्पक नेतृत्व प्राजक्ताताई सुरेश धस यांची प्रेरणा आणि कार्यकर्त्यांचे खंबीर पाठबळ यामुळे हा महोत्सव अत्यंत यशस्वी झाला आहे. आमदार सुरेश धस यांना शक्ती बुद्धी आणि युक्ती याद्वारे या मतदारसंघातील सर्वसामान्य जनता शेतकरी शेतमजूर यांच्यासाठी उत्तम उत्तम कार्य करण्याची प्रेरणा मिळावी अशी प्रभू रामचंद्राकडे आपण प्रार्थना करत आहोत. असेही त्यांनी शेवटी सांगितले.आजचा राम कथेच्या अंतिम निरूपण करताना मंदार महाराज म्हणाले की, प्रभू श्रीरामचंद्र राजघराण्यातील असून देखील त्यांनी धर्म कर्तव्य पार पाडण्यासाठी आदर्श घालून दिला राज धर्म सोडून वनवासात गेले सर्व सामान्य वानर सेनेला बरोबर घेऊन लंकाधिश अधर्मी रावणाचा वध केला आणि १४ वर्षे पूर्ण केल्यानंतरच राज धर्माचा स्वीकार करून मातेला दिलेले वचन पाळले सर्वसामान्य वानर सेनेच्या जीवावर त्यांनी लंकाधिपती रावणाचा पराभव केला याविषयी प्रतिपादन करताना मंदार महाराज म्हणाले की,



प्रभू रामचंद्र हे राजघराण्यातील असून आदर्श वागणूक वर्तणूक याचे प्रतीक म्हणून प्रभू श्री रामचंद्र यांचे आदर्श मोठे आहेत. आष्टी तालुक्यात संगीतमय श्रीराम कथा ज्ञानयज्ञाचा हा पावन सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रविवार, दि. ११ जानेवारी ते शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ या कालावधीत पंचायत समिती कार्यालय प्रांगण, आष्टी येथे दररोज हजारो रामभक्तांच्या उपस्थितीत प्रभू श्रीरामांच्या जीवनातील आदर्श, मर्यादा, त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि भक्तीचा गूढ अर्थ या कथामालिकेतून प्रभावीपणे उलगडला. प.पू. महंत मंदार महाराज रामदासी, श्री. देवदास स्वामी मठ, दादेगाव (ता. आष्टी, जि. बीड) यांच्या सुश्राव्य, ओजस्वी व प्रेरणादायी कथानिरूपणामुळे उपस्थित भक्तांच्या मनावर गहन आध्यात्मिक संस्कार झाले. यावेळी बोलताना आ.सुरेश धस म्हणाले, संगीत, अभंग, कीर्तन व कथन यांच्या समन्वयातून श्रीराम कथेने समाजातील सर्व वयोगटांना आत्मिक समाधान, सकारात्मक ऊर्जा आणि जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. या ज्ञानयज्ञातून कुटुंबसंस्था बळकट करण्याचा संदेश, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समता, कर्तव्य आणि संस्कारांचे महत्त्व यावर विशेष भर देण्यात आला. विशेषतः मकर संक्रांतीच्या दिवशी झालेल्या विशेष कथाकालावधीत भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेतला. श्रीरामांच्या आदर्श जीवनातून मिळालेली प्रेरणा ही तरुणांना योग्य मार्गदर्शन देणारी, तर ज्येष्ठांना आत्मिक शांती देणारी ठरली.आठवडाभर चाललेल्या या आध्यात्मिक पर्वामुळे श्रीराम कथेचे श्रवण करत भक्तीमय वातावरण निर्माण झालेले पाहायला मिळाले. आष्टी या ठिकाणी प्रथमच श्रीराम कथा आयोजित केली होती मंत मंदार महाराज रामदासी हे आष्टीचे भूमिपुत्र असूनही त्यांचे संपूर्ण महाराष्ट्रभर आणि राज्याबाहेर देखील कार्यरत होतात त्यामुळे तालुक्याचे भूमिपुत्र असलेले महंत मंदार महाराज रामदासी यांची राम कथा आयोजित केली होती संक्रांती सारखा सण असून देखील महिला वर्गाने या श्रीराम कथेला साथही दिवस उपस्थित राहून प्रचंड प्रतिसाद मिळाल्यामुळे यापुढ आता नवरात्रोत्सवांमध्ये देवी महात्म्य अथवा इतर कथा तसेच पिंपळेश्वर देवस्थान च्या वतीने शिवपुराण कथा यासारखे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे असे प्रास्तविकामध्ये आमदार सुरेश धस यांनी सांगितले. आज या पवित्र संगीतमय श्रीराम कथा ज्ञानयज्ञाची विधिवत सांगता संपन्न झाली. सांगता कार्यक्रमानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्व रामभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच या दिव्य ज्ञानयज्ञासाठी अखंड सेवा देणाऱ्या महाराजांचा यथोचित सत्कार केला. या संपूर्ण श्रीराम ज्ञानयज्ञात मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश अण्णा धस प्रतिष्ठान संयोजन समितीने अतिशय सुंदर नियोजन करत अथक परिश्रम घेतले.



## ४१ उमेदवार निवडून आल्याबद्दल भास्कर दानवे यांना विठ्ठल रुक्मिणी देऊन सत्कार

जालना । प्रतिनिधी

**राज्याचे माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या जालना शहर महानगरपालिकेच्या नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल व तसेच ४१ नगरसेवक निवडून आल्याबद्दल श्री भास्कर आबा दानवे यांना विठ्ठलरुख्मिणी मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.**

या प्रसंगी आमदार लोणीकर यांनी श्री. दानवे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शहराच्या विकासासाठी तसेच नागरिकांच्या हितासाठी श्री. दानवे यांच्या माध्यमातून सकारात्मक कार्य घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्कार प्रसंगी भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकारण बाजूला ठेवून परतूरच्या विकासाला प्राधान्य देणार-आ.बबनराव लोणीकर

**नवीन बिल्डींग मध्ये नवीन भाजपचा नगराध्यक्ष प्रियंका राक्षे; प्रत्येक प्रभागाची स्वच्छता केली जाणार**

जालना । प्रतिनिधी

**राजकारण नाही, तर केवळ विकासच चालेल, असे ठाम, आक्रमक आणि स्पष्ट शब्दांत प्रतिपादन करत आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर नगरपरिषदेच्या विकासाचा अजेंडा जाहीर केला. नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियंका शहाजी राक्षे व उपनगराध्यक्ष विशाखा विजय राखे यांच्या पदग्रहण समारंभात त्यांनी राजकीय कुरघोड्यांना थेट इशारा देत, परतूरच्या सर्वांगीण विकासाला युद्धपातळीवर प्राधान्य दिले जाईल, असे स्पष्ट केले.**

यावेळी बोलताना लोणीकर म्हणाले, नगरपरिषदेत राजकीय मतभेदांना कोणतीही जागा नाही. विकासाच्या आड येणाऱ्या कोणत्याही पक्षीय खेळीला किंवा व्यक्तिगत अजेंड्याला थेट रोखले जाईल. परतूरच्या विकासाला अडथळा आणणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देखील एवढी आ लोणीकर यांनी दिला. विकासाच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका मांडताना लोणीकर म्हणाले, विकासालाच सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, आरोग्य सेवा आणि शिक्षण या मूलभूत बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. केवळ घोषणा करून थांबणार नाही;



काम प्रत्यक्ष जमिनीवर दिसले पाहिजे, असे स्पष्ट आदेशच यावेळी लोणीकरांनी प्रशासनाला दिले. नगरपरिषद स्तरावरील राजकीय समीकरणांबाबत बोलताना आमदार लोणीकर यांनी कोणताही संभ्रम न ठेवता ठाम भूमिका मांडली. भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस यांची नगरपरिषद स्तरावरील युती केवळ सत्तेसाठी नसून शहराच्या विकासासाठी आहे. ही युती पुढील पाच वर्षे अभेद्य राहील आणि कोणीही ती डळमळीत करू शकणार नाही, असा ठोस संदेश देखील लोणीकर यांनी दिला. पुढे बोलतान लोणीकर म्हणाले की राजकीय एकता आणि प्रशासकीय पारदर्शकता यांच्या बळावर परतूर शहराचा कायापालट अटळ आहे. निधी, योजना आणि विकासकामे थांबणार नाहीत. प्रशासन चालेल ते नियमाने, आणि निर्णय होतील ते केवळ शहरहिताचे आहे असे देखील यावेळी म्हणाले. माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या माध्यमातून परतुर नगरपरिषदेची जुनी झालेली गळत असलेली बिल्डिंग असल्यामुळे ६ कोटी रुपयांची नवीन इमारत मंजूर करण्यात आली आहे या इमारतीचे बांधकाम सद्यस्थितीत सुरू असून सद्यस्थितीत नगरपरिषद कार्यालयाचे जुनी तहसील व कोर्टाच्या जागेत स्थलांतर करण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी आ. लोणीकर यांनी भाकीत केले होते की परतुर नगरपरिषदेच्या नवीन इमारतीमध्ये भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्ष बसेल आणि हे आमदार यांचे भाकीत खरे ठरले असून लवकरच नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल व या इमारतीमध्ये भारतीय जनता पक्षाचा नगराध्यक्ष बसेल, भूमिपूजन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्या भाषणात आमदार बबनराव लोणीकर म्हणाले होते की माझ्या जिभेवर तीळ आहे त्यामुळे मी जे बोलतो ते खरे होते आणि आज त्याची प्रचिती आली. प्रियंका शहाजी राक्षे या भारतीय जनता पार्टीच्या नवीन इमारतीमध्ये बसणाऱ्या पहिल्या अध्यक्षा ठरणार आहेत. परतूर नगरपरिषदेकडून 'स्वच्छता सेवा पंधरवाडा' राबविणार; प्रभाग क्र. १ ते ११ पर्यंत विशेष स्वच्छता मोहीम, कर्मचाऱ्यांचा पदग्रहण सोहळयात पहिल्यांदाच गणवेशात सहभाग परतूर नगरपरिषदेच्या वतीने शहरातील स्वच्छता अधिक प्रभावी करण्यासाठी 'स्वच्छता सेवा पंधरवाडा' राबविण्यात येणार असून या मोहिमेअंतर्गत प्रभाग क्रमांक १ पासून प्रभाग क्रमांक ११ पर्यंत प्रत्येक प्रभागात विशेष स्वच्छता अभियान राबविले जाणार आहे. पदग्रहण सोहळ्यानंतर नगरपरिषदेने स्वच्छता व नागरी सुविधांबाबत महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत.

### जनतेबरोबर ईश्वराचा देखील आम्हाला आशीर्वाद- राहुल लोणीकर

आमदार लोणीकर यांच्या भूमिकेला दुजोरा देत भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितले की, नगरपरिषदेचा विकास हाच आमचा एकमेव अजेंडा आहे. सर्व नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांना विश्वासात घेऊन पारदर्शक, गतिमान व लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जनतेने नगराध्यक्ष व नगरसेवक निवडून दिल्याबद्दल जनतेच्या आशीर्वाद तर मिळाला होताच परंतु स्वीकृती नगरसेवक पदासाठी ईश्वर चिट्ठी च्या माध्यमातून दोन्ही आमच्या बाजूने निघाल्या याचाच अर्थ ईश्वराचा देखील आशीर्वाद आमच्याच पाठीशी असून परतुर शहराचा कायापालट केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही अशी प्रतिक्रिया भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी दिली.

पान १ वरून...

### कापसाचे दर पडण्याच्या

तेलंगणातील उत्पादनात ४.५ लाख गाठी, कर्नाटकात १ लाख गाठी आणि तमिळनाडूत ५० हजार गाठी वाढ केली आहे. तर मध्य प्रदेशातील उत्पादनाच्या अंदाजात १ लाख गाठी आणि ओडिशात ५० हजार गाठींची घट केली आहे. 'सीएआय'ने देशातील कापूस वापराचा अंदाज १० लाख गाठींनी वाढवला आहे. डिसेंबरच्या अंदाजात वापर २९५ लाख गाठी होईल, असे म्हटले होते. पण जानेवारीच्या अंदाजात ३०५ लाख गाठी वापर होईल, असे नमूद केले आहे. म्हणजेच गेल्या महिन्यातील अंदाजाच्या तुलनेत कापूस उत्पादनात ७.५ लाख गाठी आणि वापरात १० लाख गाठींची वाढ दाखविण्यात आली आहे.

-------------

### पोलिस व्हॅनला अपघात

नुकसान झाले आहे. जखमी मोटरसायकलस्वाराला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

------------

### मुंबईत अडीच-अडीच

शिंदे सेनेच्या सर्व नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये ठेवण्यात येत आहे. ते पुढील दोन ते तीन दिवस तिथेच मुक्कामी असतील. मुंबईचा महापौर भाजपचा होणार की एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ही संधी मिळणार, हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात दिल्लीच्या माध्यमातून होणाऱ्या चर्चेवर अवलंबून असेल. या राजकीय घडामोडींमुळे मुंबईच्या महापौर पदाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. यावेळी मुंबई महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाने दणदणीत ८९ जागा जिंकल्या. या चुरशीच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना-रिपाइं महायुतीने २२७ सदस्यीय महानगरपालिकेत ११८ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवले. गेल्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपला ८२ जागा मिळाल्या होत्या. या लढाईत शिंदे सेनेची मात्र पिछेहाट झाली. जेमतेम २९ जागांवर शिंदे सेनेला समाधान मानावे लागले. याउलट भाजपने मात्र आजवरच्या सर्वाधिक ८९ जागा जिंकल्या. फंदफितुरी होऊनही ठाकरेंनी ६५ जागा खेचून आणल्या. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला ५२ जागा लढूनही फक्त ६ जागा जिंकता आल्या. २४ जागांवर घसरलेल्या काँग्रेसला स्थानिक नेत्यांनीच केलेला दगाफटका भोवला असल्याची चर्चा होत आहे.

-----------

### दोन्ही राष्ट्रवादी

राज्यातील महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींना जोरदार झटका बसल्यानंतर शनिवारी बारामतीत ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्याकडे महत्त्वाची बैठक पार पडली या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, माजी मंत्री राजेश टोपे, आमदार रोहित पवार आदींची उपस्थिती होती. कृषी प्रदर्शनाच्या पाहणीनंतर या नेत्यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक एकत्र लढणार असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर बारामतीत शरद पवार उपमुख्यमंत्री अजित पवार व अन्य नेते मंडळींची महत्त्वाची पत्रकार परिषद सुद्धा पार पडत आहे.

----------

### बीडमध्ये जीएसटी अधिकाऱ्याचा

करण्यात आला होता. यावरून हा काही भानामतीचा प्रकार आहे काय याचा तपास पोलीस करत आहेत. गाडीमध्ये रक्ताचे डाग आणि त्यांच्या डोक्यालाही मार असल्याचे दिसून आले आहे. घातपाताचा संशय व्यक्त केला जात असून, याचा कसून तपास करावा अशी विनंती नातेवाईकांच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, पोलिसांनी फॉरेन्सिक लॅबच्या वतीने संपूर्ण परिसराची तपासणी करण्यात आली असून, यात काही पुरावे सापडतात का याचा तपासणी पोलीस करीत आहेत. कर विभागातील एका अधिकाऱ्याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, याबाबत पोलीस सखोल तपास करीत आहेत. तपासानंतरच घटनेचे खरे कारण समोर येणार आहे.

**नागपूर प्रकरणाशी संबंध आहे काय?**

गेल्या काही दिवसांपूर्वी नागपूर पोलिसांनी जीएसटी बुडवल्याच्या प्रकरणांमध्ये बीडच्या दोघांना अटक केली होती. यात आणखी काही संशयित होते. त्यांची चौकशी सुरू होती. या प्रकरणाशी सचिन जाधवर यांच्या मृत्यूचा काही संबंध लागतो का? याचाही तपास पोलीस करणार आहेत.

-----------

### माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांना अंबाजोगाई

उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे न्यायालयाने ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे. न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

---------

### शिवशक्तीने सत्ताधारी

हा पक्ष कागदावर आहे, जमिनीवर नाही. तो जमिनीवर असता, तर त्यांना पक्ष फोडावे लागले नसते, यंत्रणेचा दुरुपयोग करावा लागला नसता. साध्या शिवसैनिकांनी प्रचंड पैशाच्या धबधब्यासमोर निष्ठा दाखवत कशी ताठ मानेने लढू शकते, हे दाखवून दिले आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, त्यांचा विजय डागाळलेला आहे. ज्याच्या आधारावर ते महापौर बनवणार आहेत, त्यांना लाज वाटली पाहिजे. मी मधल्या काळात भाजपला ॲनाकोंडा म्हणालो होता. मला माझ्या शिवसेनेचा अभिमान आहे, असेही त्यांनी यावेळी ठणकावून सांगितले. सर्वच महापालिकांच्या प्रचाराला मी जाऊ शकलो नाही. मी जेमतेम मुंबई, ठाणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या महापालिकांच्या प्रचाराला गेलो होतो. चंद्रपूरमध्ये सुद्धा शिवसेनेचे चांगले नगरसेवक निवडून आले आहेत. परभणीमध्ये शिवसेनेने उत्तम यश प्राप्त केले आहे. मी जाऊ शकलो नाही त्या सर्व शिवसैनिकांची आणि मतदारांची दिलगिरी व्यक्त करतो. अगदी चांदा ते बांदा शिवसेना आणि शिवशक्ती - म्हणजेच शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादी यांच्या युतीला मतदान केले आहे, त्या सर्व मतदारांना आणि तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदनही करतो, असे ते म्हणाले. राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका सत्ताधारी पक्षाकडून अत्यंत घाणेरड्या पद्धतीने लढवल्या गेल्या. जणू काही प्रत्येक निवडणूक ही त्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे, अशा पद्धतीने त्यांनी साम-दाम-दंड-भेद या पलीकडे जाऊन सर्व गोष्टींचा वापर केला. अफाट पैशाची लालूच दाखवली, आमिषं दाखवली. आमच्या काही शिवसैनिकांना तडीपार करण्याच्या नोटिसा दिल्या, काही जणांना अटक करण्यात आली. काही ठिकाणी दंगली भडकवण्याचे प्रयत्न झाले. ठाणे, कल्याण-डोंबिवली येथील आमच्या उमेदवारांना पैशांची आमिषं देण्यात आली. काही ठिकाणी जोर-जबरदस्तीने त्यांना उमेदवारी मागे घ्यायला लावली. या सगळ्या गुंडगिरीला न डरता ज्या उमेदवारांनी ही लढत दिली आणि ज्या मतदारांनी निर्भयपणे मतदान केले, ते सर्वजण खरोखर लोकशाहीचे रक्षक आहेत, असेही ते म्हणाले.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. १८ जानेवारी २०२६


## थोडक्यात

### आदित्य बुऱ्हाडेची राष्ट्रीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये उत्कृष्ट कामगिरी

कडा । प्रतिनिधी

कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल या सीबीएसई बोर्ड मान्यता प्राप्त शाळेचा विद्यार्थी आदित्य बुऱ्हाडे (इ.- ७ वी ) याने मुळशी, जिल्हा पुणे.येथे आयोजित केलेल्या चौथ्या राष्ट्रीय रोलर थलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये(२०२५ - २६) १४ वर्ष वयोगटाखालील रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये चौथे स्थान मिळवले असून त्याची १ फेब्रुवारी २०२६ रोजी गोवा येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपच्या चाचणी साठी निवड झालेली आहे. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरी बद्दल त्याला क्रीडा शिक्षक अहेमद पठाण आणि वैशाली शिंदे यांनी मार्गदर्शन केले आहे.



त्याचे संस्थेचे अध्यक्ष- श्री अमित राठोड, उपाध्यक्ष- श्री. संदिप चानोदीया, सचिव - श्री. हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष- डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा, श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, मुख्याध्यापक - श्री अभिलाष के. के, उपमुख्याध्यापिका - श्रीमती.अफशान शेख सल्लागार श्री मेहेर सर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### श्री शंकर विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

घाटनांदूर । प्रतिनिधी

येथील श्री शंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना एका दिवसासाठी शिक्षक व शिक्षिका म्हणून जबाबदारी देऊन मोठ्या उत्साहात स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला

शालेय जीवनात विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि जबाबदारीची भावना वाढवण्यासाठी साजरा केला जाणारा दिवस म्हणजे स्वयंशासन दिन होय त्याप्रसंगी विद्यार्थ्यांमधूनच मुख्याध्यापिका म्हणून माया जयराम दराडे हिने तर पर्यवेक्षक म्हणून प्रदीप ज्ञानेश्वर नागरगोजे याने कणखर जबाबदारी पार पाडली. सहशिक्षिका म्हणून स्वाती मुंडे,स्नेहल गित्ते, राजनंदनी कराड, सायली बडे, अंजली गित्ते, प्राची बडे, क्रांती गित्ते, वैष्णवी गित्ते,मीनाक्षी बडे,गायत्री बडे यांच्यासह अनेक मुलींनी तर सहशिक्षक म्हणून अनिकेत तिडके स्वप्नील गित्ते रुद्र कांगणे श्रीनाथ गित्ते प्रदीप फड गोविंद मिसाळ चैतन्य बडे यांच्या सह अनेक मुलांनी अध्यापनाचे कार्य केले त्यांना मु अ व्ही एल गित्ते, पर्यवेक्षक व्ही एम दौंड, जी डी बनसोडे, परसराम फड, दिपक नाकाडे, अंकुश माले यांनी मार्गदर्शन केले. स्वयंशासन दिना निमित्त विद्यार्थ्यांमध्ये अतिशय आनंद आणि उत्साह दिसून येत होता.

## आष्टीत चार दिवसीय डॉक्टर स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होणार-भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे तिसऱ्या वर्षी डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन दि. १९ ते २४ फेब्रुवारी २०२६ कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.सर्व शेतकरी, महिला व विद्यार्थी युवकांसाठी ज्ञान आणि मनोरंजनाची पर्वणी ,आधुनिक शेती, शाश्वत विकास व ग्रामीण समृद्धीचा संदेश देणारे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन १९ ते २४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आष्टी येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती मुख्य संयोजक माजी आ.भीमराव धोंडे यांनी दिली.



या कृषी प्रदर्शनाचे आयोजन आनंद चॅरिटेबल संस्था,आष्टी व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्न श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय,आष्टी संयुक्तपणे करणार आहेत.या कृषी प्रदर्शनाचे नियोजन वाबळे इव्हेंट मॅनेजमेंट, अहिल्यानगर यांच्यामार्फत करण्यात येत असून मागील दोन कृषी प्रदर्शनापेक्षा नाविन्यपूर्ण आश्या शेती विकासावर आधारित विविध दालने व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये खते व बियाण्यांची दालने,शेती अवजारे,आधुनिक शेती तंत्रज्ञान, कमी खर्चात अधिक उत्पादन,नैसर्गिक व सेंद्रिय शेती, पाणी व मृदा व्यवस्थापन, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीड, तण व रोग नियंत्रण औषध कंपन्यांची दालने असणार आहेत.याशिवाय महाराष्ट्र राज्य कृषी विभागाची दालने देखील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर ठरणार आहेत. आधुनिक यंत्रसामग्री, स्वयंचलित वाहने, तसेच नर्सरीमधील विविध फळझाडे, फुलझाडे व भाजीपाला रोपांचे प्रदर्शन व विक्री हे या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण असणार आहे. महिलांसाठी गृहउद्योग, अन्नप्रक्रिया,बचत गटांचे उपक्रम, हस्तकला, पोषणमूल्ययुक्त पदार्थ निर्मिती यावर विशेष मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.यासोबतच युवकांसाठी स्टार्टअप संधी व कृषी व्यवसाय मार्गदर्शन देण्यात येणार आहे. कृषी विद्यापीठ तज्ञ, प्रगतिशील शेतकरी, महाराष्ट्र राज्य कृषी विभाग अधिकारी मार्गदर्शन, चर्चासत्रे, पारीसावंद यांचे आयोजनकरण्यात येणार आहे. प्रदर्शन कालावधीत संध्याकाळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहभागातून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन . करण्यात येणार असून यामध्ये शेतकरी गीते, पारंपरिक लोकगीते व विविध कलाविष्कार सादर केले जाणार आहेत. फूड स्टॉल्समध्ये ग्रामीण व शहरी चवींची चविष्ट मेजवानी रसिकांसाठी उपलब्ध असणार आहे.शेती ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, मनोरंजन व सामाजिक प्रबोधन यांचा संगम असलेले हे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणार आहे. असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कृषी प्रदर्शनाला परिसरातील शेतकरी,महिला बचत गट,विद्यार्थी, युवक व कृषी उद्योजकांनी भेट देऊन नव नवीन तंत्रज्ञान शिकण्याच्या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंद शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे, संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.अजयदादा धोंडे, व सर्व सदस्यांनी केले आहे.

## मल्हार योध्दे बोऱ्हाडे यांच्या आंदोलनास दडपशाही करू नका

माजलगाव । प्रतिनिधी

मल्हार योध्दे दिपक बो-हाडे यांच्या आंदोलनास दडपशाही करू नका अशी मागणी माजलगावात सकल धनगर समाजाच्या वतीने पोसिल प्रशासनाकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.




दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना येथुन मुंबई येथे दि.२१ जानेवारी पासुनच्या आरक्षण आंदोलनास उपोषणास जात असलेल्या मल्हार योध्दे दिपक बो-हाडे यांच्या आंदोलनास आठकाव केल्या जात आहे.दि.१७ जानेवारी पासुन जालना येथे दिपक बो-हाडे यांना नजर कैदेत ठेवले आहे. असे न करता संविधानिक मार्गाने चालु होत असलेल्या धनगर जमातिच्या आंदोलनास विनाकारण जबरदस्तीने आठकाव करत असाल आणि मल्हार योध्दे दिपक बो-हाडे यांना अटक करून शासनाने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला तर त्याची सर्वस्व जबाबदारी पोलिस प्रशासन व राज्य शासनाची असेल.

## पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मनसेकडून सत्कार ; समाजहितासाठी निर्भीड पत्रकारितेचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष सानप यांची, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर यांची तसेच कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. हा सत्कार सोहळा उत्साहपूर्ण आणि सकारात्मक वातावरणात पार पडला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शिवसेना नेते सुभाष राऊत यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, पत्रकारिता ही लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ असून, समाजातील शोषित, वंचित व सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य पत्रकार बांधव करीत आहेत. आष्टी तालुक्यातील पत्रकारांनी निर्भीड, निष्पक्ष व सत्याधारित पत्रकारिता करत लोकशाही अधिक बळकट करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.मनसे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित नेतृत्वाकडून तालुक्यातील पत्रकारांचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला. पत्रकारांच्या समस्या, अडचणी तसेच त्यांच्या हक्कांसाठी संघाने सातत्याने लढा द्यावा व सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करावे, असे त्यांनी नमूद केले.या प्रसंगी पत्रकार जावेद पठाण, आण्णासाहेब साबळे, सचिन रानडे, ग्रामपंचायत सदस्य संतोष कदम, डॉ. सुनील पारखे, पत्रकार गणेश दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

सत्काराला उत्तर देताना अध्यक्ष संतोष सानप यांनी बोलताना सांगितले की, आष्टी तालुका पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे आवाज उठवला जाईल. पत्रकारांच्या सुरक्षेपासून ते व्यावसायिक सन्मानापर्यंतचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघ कटिबद्ध राहील. उपाध्यक्ष मनोज पोकळे व शरद रेडेकर तसेच कार्याध्यक्ष भीमराव गुरव यांनीही संघाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत, लोकहिताचे प्रश्न प्राधान्याने मांडण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप सर्वांनी एकत्र येऊन तालुक्यातील पत्रकारिता अधिक सक्षम, विश्वासार्ह व लोकाभिमुख करण्याचा निर्धार करत केला. हा सत्कार सोहळा पत्रकार संघाच्या भावी कार्याला नवी दिशा देणारा ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

पान ६ वरुन...

### किल्ला मैदान येथील

नसल्यामुळे व राजकीय हस्तक्षेप दिवसेंदिवस होत असल्यामुळे गुत्तेदारांनी डाकबंगला सोडुन दिले गेल्या कित्येक वर्षापासून बंद असल्यामुळे डाकबंगल्याची अवस्था जिर्ण अवस्थेत असून शेवटचे स्वास घेत आहे.

या डाकबंगल्याच्या मोकळया जागेवर नगर पालिकेच्या निलंबीत कर्मचाऱ्यांनी त्याचे बांधकामाची माती आनुन टाकल्यामुळे डाकबंगला पुर्णपणे बंद झाला आहे डाकबंगल्याच्या आतील भागामध्ये व्यसन करणारी तरुन पिढी येऊन येथे नशा करु लागले आहे. तसेच आजु-बाजूचे परिसरातील लोकांनी डाकबंगल्याचे तटरक्षक भिंत तोडुन घराचे बांधकाम करुन अनाधिकृत अतिक्रमाण केले आहे. प्रशासनाने तात्काळ संबंधीतांना नोटीसा देवुन कार्यवाही व डाकबंगल्याचे जागेची पुर्नर मोजणी करुन चारही दिशेने तटरक्षक भींत बांधुन डाकबंगला जनतेच्या सेवेसाठी तात्काळ उपलब्ध करण्यात यावे असे निवेदन समाजसेवक पठाण मुकरमजान यांनी न.प.प्रशासनाला दिले आह

### अल फलाह कमिटीच्या

मौलाना साहब यांनी नवविवाहित जोडप्यांना उद्देशून संसार कसा यशस्वी करावा, पती-पत्नीमध्ये प्रेम, संयम, विश्वास आणि परस्पर सन्मान किती आवश्यक आहे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. इस्लामिक शिकवणीनुसार संसारात साधेपणा, प्रामाणिकपणा आणि अल्लाहवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व त्यांनी अत्यंत सुंदर शब्दांत मांडले. विशेषतः आजच्या काळात वाढत असलेल्या अनावश्यक खर्च, हुंडा प्रथा आणि दिखाऊ विवाह पद्धतीवर त्यांनी स्पष्ट शब्दांत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नवदांपत्यांची सर्व सविस्तर माहिती अतिशय छान, स्पष्ट आणि प्रभावी पद्धतीने मौलाना साहब यांनी मांडली. प्रत्येक विवाह हा समाजासाठी एक आदर्श ठरावा, असा संदेश त्यांनी दिला. अल फलाह कमिटीच्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे समाजात सामाजिक समता, ऐक्य आणि बंधुभाव वाढतो असे नमूद केले. या सामूहिक विवाह सोहळ्याला नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, धर्मगुरू आणि नवदांपत्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध, शांततेत आणि धार्मिक वातावरणात पार पडला. अल फलाह कमिटी, माजलगाव यांच्या या उपक्रमामुळे समाजात एक आदर्श निर्माण झाला असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### चोवीस तासात अल्पवयीन

टीम सकाळी ९ वाजता बीड ला आली. पीडित मुलीला विश्वासात घेवून तिचे समुपदेशन केले. तसेच तिच्या आईवडिलांसोबत तिची भेट करून दिली. त्यानंतर पोस्टे बीड ग्रामीण येथे सदर पीडीत मुलगी व आरोपीला पुढील तपासकामी हजर केले. सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली, पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, पोशी योगेश निर्धार , गजानन चौधरी, सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

### गेवराईत टायर पेटवले

आझाद मैदान येथे अमरण उपोषण करणार असल्याने सरकाने बोराडे यांना दि. १७ जानेवारी रोजी सकाळी अटक करून संपूर्ण धनगर समाजाचा मोठा अपमान केल्याच्या निषेधार्थ गेवराई येथे सकल धनगर समाजाच्या वतीने राज्य महामार्गावर टायर पेटवून जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी गजानन काळे, अशोक बोरकर यांच्या पुढाकाराखाली निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच बीड येथे शासकीय विश्रामगृह येथे सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत सरकारची जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी अ‍ॅड. राजू शिंदे, अंकुश येळे, बाबुलाल ढोरमारे, प्रकाश देशमुख, ज्ञानू ढोरमारे सह आदी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ऊसाच्या फडातून थेट सीमेपर्यंत

डिगे, सुरज जाधव, अमोल डिगे, शरद वजीर, राजेश शिंदे, विनोद म्हेत्रे, सौरभ दिवटे, शुभम टिपरे तसेच वडवणी प्रतिनिधी अशोकजी फपाळ सर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी विकास यांचा सत्कार करून त्यांच्या आईला साष्टांग नमन करत अभिनंदन केले.आज आईच्या डोळ्यातले अश्रू दुःखाचे नाहीत, तर विजयाचे आहेत.ऊसाच्या फडात घाम गाळणाऱ्या आईचा मुलगा आज देशाच्या सीमेवर उभा आहे -याहून मोठा अभिमान काय असू शकतो? विकास शिंदे पाटील यांची ही कहाणी गरीबीने झुकवलेल्या प्रत्येक आईसाठी, आणि संघर्षात खचलेल्या प्रत्येक तरुणासाठी हार मानू नकोस असा जिवंत संदेश आहे.

### बीडमध्ये संविधान महोत्सव

प्रभावी जागर सादर करणार आहेत. या दोन्ही कार्यक्रमांसाठी प्रवेश विनामूल्य असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भारतीय संविधानाच्या मूल्यांचा गौरव करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

ख्यातनाम गायक चेतन चोपडे, अजय देहाडे बीडमध्ये

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भारतीय संविधान अमृत महोत्सवाचे दोन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि. १७ रोजी सायंकाळी ६ वाजता महासूर्य हे भव्य महानाट्य सादर होणार आहे.तर रविवार दि. १८ रोजी सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक चेतन चोपडे आणि अजय देहाडे यांचा संविधानाचा जागर हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संविधान मूल्यांचा जागर करणाऱ्या या महोत्सवाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने बीडकरांना दर्जेदार सांस्कृतिक पर्व अनुभवायला मिळत आहे. लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी असे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत.

-प्रा.विनोद दळवी
नाट्य,निर्माता, दिग्दर्शक,बीड

## जवळा माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात तीन दिवसीय जिजाऊ महोत्सव संपन्न

बीड । प्रतिनिधी

आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळ बीड द्वारा संचलित ग्रामीण भागातील एक अत्यंत विश्वासपात्र शैक्षणिक संकुल म्हणून मागील चार दशकांपासून अत्यंत नावाजलेली शाळा म्हणून नावलौकिक असलेल्या जवळा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात सलग तीन दिवस विविध उपक्रमांनी जिजाऊ महोत्सव साजरा करण्यात आला.



या तीन दिवसांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी रांगोळी व मेहंदी स्पर्धे सोबत राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर आधारित वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली, या वकृत्व स्पर्धेत ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर दुसऱ्या दिवशी आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता ज्यात विद्यार्थ्यांनीं विविध २८ स्टॉल लावून, विक्री व नफा याचे गणित प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेतले.

तिसऱ्या दिवशी माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून सौ. गयाबाई खांडे उपस्थित होत्या तर अध्यक्ष स्थानी श्रीमती अलका अंदुरे होत्या. या मेळाव्याच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन केले गेले. या माता पालक मेळाव्यात म्हाळस जवळा, पिंपळगाव, म्हाळसापुर, वाकनाथपूर, रज्जाकपुर गणेशनगर या पंचक्रोशीतील तब्बल १६५ महिला पालक उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. या महिला पालकांनी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगती बद्दल समाधान व्यक्त करत असतानाच काही उपयुक्त सूचना सुद्धा मांडल्या त्या सूचनांचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक प्रदीप गाडे यांनी स्वागत केले.या मेळाव्यात विद्यार्थी विद्यार्थिनींचा विविध गुणदर्शन कार्यक्रम सुद्धा घेण्यात आला. देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थी विद्यार्थिनींचे लेझीम सादरीकरण उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फेडणारे ठरले. मेळाव्याचे सूत्रसंचालन शंकर टेकाळे यांनी केले. शेवटी उपस्थित माता पालकांना संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर अंदुरे मॅडम, चव्हाण मॅडम आणि मस्करे मॅडम यांच्या हस्ते हळदीकुंकू देऊन वान देण्यात आले. हा तीन दिवसीय महोत्सव यशस्वी होण्यासाठी पर्यवेक्षक रमेश डोळे वरिष्ठ लिपिक शेख सर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

## गोरक्षनाथ प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथील गोरक्षनाथ प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव सोमनाथराव बडे सर रामा भोगे संचालक खरेदी विक्री संघ बीड माजी सरपंच नागेश शिंदे, बंडु गाडीवान सरपंच ढेकणमोहा पोलीस कॉन्स्टेबल घुमरे साहेब, तावरे साहेब, गोवर्धन दराडे, संतोष जाधव , दिनेश पिसाळ सुरेश देवकते प्रमुख पाहुणे उपस्थित होते यावेळी लहान चिमुकल्यांनी लोकगीत, भक्ती गीत, कोळीगीत ,विनोदी नाटिका, मराठमोळी लावणी अशा विविध नृत्यप्रकार सादर केले तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिकांचेही सादरीकरण करण्यात आले.विद्यार्थ्यांनी सादर केलेली गाणी, समूह नृत्य आणि नाटकांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.



विद्यार्थ्यांचा सहभाग लहान मुलांपासून ते मोठ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने कार्यक्रम पाहण्याचा आनंद घेतला. पालकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.हा स्नेहसंमेलन कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि त्यांच्यामध्ये एकजुटीची भावना निर्माण करणारा ठरला. या वार्षिक सोहळ्याने सर्वांनाच आनंदित विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुंडे सर (मुख्याध्यापक) मनोज बडे सर , बळीराम जाधव सर, (प्राथ मुख्याध्यापक) अमोल गीते सर, प्रकाश शिंदे सर, राऊत सर, तावरे सर, खराडे सर, डोंगरे सर, सुतार सर, गीते सर, मुसळे सर, घोरड सर, चौरे सर, वाघमारे सर, कांबळे सर , एम आर मुंडे सर ,भुरके सर ,काळे सर पवार सर ,थापडे सर, तीरणकर सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश शिंदे सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गाव तलाव संरक्षण भिंती लगतचे अतिक्रमण काढण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना जलसमाधी आंदोलन करणार - शेख , शिगणे

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथील जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावाच्या संरक्षण भिंती लगटच्या बेकायदेशीरपणे असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी व ग्रामसेवक वेळो वेळी निवेदन व आंदोलनाचा इशारा देऊन देखील हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी तलवाडा येथील पाझर तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास दिनांक १५/१/२०२६ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की वरिल संदर्भात आम्ही दिनांक १०/६/२०२५ रोजी, १५/७/२०२५ रोजी, ६/८/२०२५ रोजी मा जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, आणि पंचायत समिती गेवराई याना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबत वारंवार निवेदने दिली होती. त्या त्या निवेदनाला आणुसरुन आम्हाला आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन देऊन आमचे जलसमाधी आंदोलन स्थगित करण्यास आम्हाला भाग पाढल्या गेले. पण आज पर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक २६/१/२०२६ रोजी जलसमाधी घेणार याची शासन व प्रशासनाने नोंद घ्यावी. अनाधिकृत बांधकाम स्वत काढून घेणे बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांचे पत्र क्रमांक जा.क. २६२८




दिनांक १८/०७/२०२५ नुसार आले असता गाव तलाव संरक्षण भिंतीलगतच्या सर्व अतिक्रमणधारकास पहिली नोटीस दिनांक ११/०८/२०२५ रोजी तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब यांनी काढली होती व नंतर १५/९/२०२५ रोजी दुसरी नोटीस काढली पण तिसरी व अंतिम सात दिवसांची नोटीस देण्यास टाळाटाळ करण्यात आली व आमचे १५ ऑगस्ट आणि १७ सप्टेंबर रोजीचे जलसमाधी आंदोलन अतिक्रमण काढू म्हणून स्थगित करण्यात आले होते. आतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसांच्या आणुषंगाने अतिक्रमण काढणे बंधनकारक असताना देखील टाळाटाळ करण्यात आल्यामुळे मी शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने आम्ही दोघांनी मिळून असा नाईलाजाने निर्णय घेतला आहे की आम्ही दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी पुन्हा तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावात स्थानिय प्रशासकीय अधिकाऱ्याच्या वेळकाढूपणामुळे जलसमाधी आदोलन करणार आहोत. आमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील त्यातल्या त्यात तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब आणि गटविकास अधिकारी सानप साहेब यांची राहील, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास निवेदन देऊन दिला आहे.

तलवाडा गाव तलाव लगटच्या आतिक्रमण संदर्भात जिल्हाधिकारी, बीडीओ, ग्रामसेवक व प्रशासकाची भुमीका संशयास्पद!

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात जिल्हाधिकारी बीड, बीडीओ गेवराई, ग्रामसेवक व प्रशासक तलवाडा यांना वेळोवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्याची मागणी केली होती. त्या आणुषंगाने संबंधित प्रशासनाने आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीस देऊन अर्थिक तडजोडीतुन हे प्रकरण पेंडिंग ठेवल्याची चर्चा होत आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी या बाबत संबधित प्रशासनास परत स्मरण पत्र व निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात मागणी करत २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.




# पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन शाश्वत शेतीसाठी वरदान ठरेल - मयंक गांधी

परळी। प्रतिनिधी

पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण होऊन त्यामध्ये केले जाणार असल्यामुळे करोडो लिटर पाणी जमिनीत साठवले जाईल. हेच पाणी नव्याने फळबाग लागवड करून त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक समृद्धी साधण्यासाठी मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले तर मध्य प्रदेश सरकारचे माजी सचिव तथा ज्येष्ठ सनदी अधिकारी सुधी मोहंती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हटले की, शाश्वत शेतीतून शेतकऱ्यांची प्रगती व्हावी यासाठीची मयंक गांधी यांना प्रचंड तळमळ असून, ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था ही या भागाला लाभलेले वरदान आहे. संस्थेकडून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये लोकांनी उत्स्फूर्त लोकसहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि सन फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पापनाशी नदीच्या खोलीकरण आणि रुंदीकरण कामाचा शुक्रवारी भव्य शुभारंभ करण्यात आला, याप्रसंगी ते बोलत होते.




अंबाजोगाई आणि परळी तालुक्यातून वाहणाऱ्या पापनाशी नदीलगत असलेल्या राक्षसवाडी, बोधेगाव, कावळ्याची वाडी, परचुंडी आदी गावांना या अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. या गावांमध्ये शेतीचे नुकसान होण्यासोबतच भविष्यातील संभाव्य धोका लक्षात घेता ग्रामस्थांनी पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी ग्लोबल विकास ट्रस्टकडे केली होती. ग्रामस्थांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ग्लोबल विकास ट्रस्ट व सन फार्मा यांच्या वतीने शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी रोजी पापनाशी नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. चिचखंडी येथून उगम असलेल्या नदीचे ८ किलोमीटर पेक्षा जास्त रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यात येणार आहे. याचबरोबर नदीमध्ये म्हणजेच कूपनलिका (बोअर) घेतले जाणार असून त्याद्वारे करोडो लिटर पाणी भूगर्भात मुरविले जाणार आहे. अंबाजोगाई तालुक्यातील राक्षसवाडी तसेच परळी वैजनाथ तालुक्यातील बोधेगाव व कावळ्याची वाडी येथे या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. या शुभारंभप्रसंगी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, मध्यप्रदेश सरकारचे माजी सचिव सुधी मोहंती, डॉ. हरिश्चंद्र वंगे, अंबाजोगाईचे तहसीलदार विकास तरंगे, बालासाहेब दौडतले, बालासाहेब शेप यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंचाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमास उपस्थित असलेले संजय भोसले यांनी सदरील कामासाठी स्वयंस्फूर्तपणे १.५ लक्ष रुपये लोकवाटा दिला तर बिभीषण गडदे, बालासाहेब शेप, बालासाहेब दौडतले, राधाकिशन कुंडगर, रामभाऊ गडदे, लक्ष्मण करणार यांनीही आर्थिक स्वरूपात नदीच्या कामासाठी देणगी दिली. या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पामुळे पावसाचे पाणी अडवून भूगर्भात मुरण्यास मदत होणार असून भविष्यातील पूरस्थिती टाळता येईल. त्याचबरोबर शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढणार असून शेती अधिक शाश्वत होण्यास हातभार लागणार आहे. पापनाशी नदी पुनरुज्जीवन हा परिसरातील जलसुरक्षा आणि शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त करून जलनायक मयंक गांधी यांचे याबद्दल आभार व्यक्त केले. ''मराठवाड्याची लढाई ही केवळ पावसासाठी नाही, तर पाणी साठवण्यासाठी आणि ते टिकवण्यासाठी आहे. अतिवृष्टीमुळे वाहून जाणारे पाणी आणि दुष्काळात होणारी पाण्याची टंचाई या दोन्ही समस्यांचे उत्तर नदी पुनरुज्जीवनात आहे. पापनाशी नदीचे खोलीकरण व रुंदीकरण हे काम म्हणजे भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी उचललेले ठोस पाऊल आहे. शेतकऱ्यांच्या पाण्याचा हक्क सुरक्षित करणे आणि शेतीला शाश्वत बनवणे हेच आमचे ध्येय आहे.'' असे प्रतिपादन मयंक गांधी यांनी केले.




## जागतिक दिवस
## जागतिक धर्म दिन

### महत्वाच्या घटना

१७७८ : कॅप्टन जेम्स कूक हा हवाई बेटांवर पोचणारा पहिला युरोपियन बनला.
१९११ : युजीन बी. इलायने सानफ्रान्सिस्कोच्या बंदरात उभ्या असलेल्या यु. एस. एस. पेनसिल्व्हेनिया या जहाजावर विमान उतरवले. जहाजावर विमान उतरण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.
१९५६ : संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी मुंबईत ११४ वेळा गोळीबार
१९६४ : न्यूयॉर्क येथे वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या इमारतीचे भूमिपूजन झाले.
१९७४ : इजिप्त व इस्त्राएल यांच्यात शांतता करारावर सह्या झाल्या.
१९९७ : नोर्वेच्या बोर्ग आऊसलंडने एकट्याने व कोणाच्याही मदतीशिवाय अटलांटिक महासागर पार केला.
१९९८ : मदनमोहन पूंछी यांनी भारताचे २८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९९ : नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
२००५ : एअरबस ए-३८० या जगातील सर्वात मोठ्या प्रवासी विमनाचे अनावरण करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : महाराष्ट्रातील एक प्रजाहितदक्ष पण दुर्दैवी राजे प्रतापसिंह भोसले यांचे निधन. छत्रपती शाहू (दुसरे) यांचे ते थोरले चिरंजीव होत. पेशवाईच्या अस्तानंतर माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन यांनी पुन: त्यांना छत्रपतींच्या गादीवर बसवले. पाठशाळा आणि संस्कृत व मराठीबरोबरच इंग्रजी भाषेच्या अध्यापनाला त्यांनी उत्तेजन दिले. (मृत्यू:४ आक्टोबर१८४७)
१८३३ : अमेरिकन संशोधक रे डॉल्बी यांचा जन्म.
१८४२ : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे समाजसुधारक, धर्मसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व न्यायाधीश (मृत्यू:१६ जानेवारी१९०९)
१८५४ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांचा मदतनीस तसेच त्यांचा पहिल्या दुरध्वनी संभाषणातील भागीदार थॉमस वॉटसन यांचा जन्म.
१८८९ : देवनहळ्ळी वेंकटरामनय्या गुंडप्पा तथा डी. व्ही. जी. कन्नड कवी व विचारवंत (मृत्यू:७ आक्टोबर१९७५ बंगळुरू, कर्नाटक)
१८८९ : शंकर काशिनाथ गर्गे तथा 'दिवाकर' - नाट्यछटाकार (मृत्यू:१ आक्टोबर १९३१)
१८९२ : अमेरिकन अभिनेता ऑलिव्हर हार्डी यांचा जन्म.
१९३३ : जगदीश शरण वर्मा - भारताचे २७ वे सरन्यायाधीश (मृत्यू:२२ एप्रिल २०१३)
१९५२ : वीरप्पन - चंदन तस्कर (मृत्यू:१८ आक्टोबर २००४)
१९६६ : अलेक्झांडर खलिफमान - रशियन बुद्धिबळपटू
१९७२ : विनोद कांबळी - भारतीय क्रिकेटपटू
१९९५ : साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ वि. द. घाटे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९३ : आत्माराम रावजी भट - कृतिशील विचारवंत, 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे संस्थापक (जन्म:१२ मे१९०५)
१९३६ : रुडयार्ड किपलिंग - नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश लेखक (जन्म:३० डिसेंबर १८६५)
१९४७ : कुंदनलान सैगल - गायक व अभिनेते (जन्म:११ एप्रिल १९०४)
१९६७ : कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे यांचे निधन.
१९७१ : भारीतय वकील आणि संसद सदस्य बॅरीस्टर नाथ पै यांचे निधन.
१९९६ : एन. टी. रामाराव - तेलगू अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते व आंध्रप्रदेशचे १० वे मुख्यमंत्री (जन्म:२८ मे १९२३)
२००३ : हरिवंशराय बच्चन - हिन्दी कवी (जन्म:२७ नोव्हेंबर १९०७)
२०१५ : शकुंतला महाजन तथा 'बेबी शकुंतला' - लोभसवाणे रूप, शालीन सौंदर्य आणि कसदार अभिनयाच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीत अमीट अशी मुद्रा उमटविणाऱ्या अभिनेत्री.

# हरभऱ्यावरील शेंडे, पाने व रोपे कुरतडणाऱ्या अळीचा असा करा बंदोबस्त

हरभरा पिकाची पेरणी जवळजवळ सर्वत्र आटोपली असून हे पीक सध्या रोपावस्थेत आहे. सध्या या पिकावर कट वर्म म्हणजेच शेंडे, पाने व रोपे कुरतडणाऱ्या अळीच्या किडीचा प्रादुर्भाव संभवतो. त्यामुळे किडीचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. किडींची ओळख : ही एक बहुभक्षीय कीड असून या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने उशिरा पेरणी केलेल्या पिकावर होतो. मादी पतंग सुरूवातीस पीक व तणाच्या पानांवर तसेच कोवळ्या शेंड्यावर एक-एक करुन किंवा समूहाने ३०० ते ४५० अंडी घालते. अळीची लांबी ही ०.२ ते १.५ इंच असते. या अळीचा रंग हा भुरकट हिरवा, काळपट किंवा करडा असतो. या अळीच्या पाटीवर करड्या रंगाचा पट्टा शरीराच्या दोन्ही बाजूने असतो. शेतामध्ये पाने शेंडे कुरतडलेल्या अवस्थेत दिसून येतात. मात्र अळी ही झाडाच्या बुंध्याला मातीमध्ये लपून बसते व मुख्यत्वे रात्री पिकावर येऊन पाने व शेंडे कुरतडते. प्रादुर्भाव जास्त असल्यास दिवसा देखील ही अळी पिकावर आढळून येते. पूर्ण वाढ झालेली अळी १.५ ते २ इंच लांब असते. अळीला स्पर्श केल्यास तो शरीराचा सी आकार करताना दिसून येते. पिकाच्या सर्व अवस्थामध्ये या अळीचा प्रादुर्भाव होवू शकतो. ही कीड रोप अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास रोप कुरतडते व नंतरच्या अवस्थेत प्रादुर्भाव झाल्यास पाने व शेंडे कुरतडते. पूर्ण वाढ झालेली अळी ही जमिनीमध्ये कोषावस्थेत जाते.

असे करा व्यवस्थापन : शेत किंवा बांधावर कचऱ्याचे ढीग तसेच तण राहणार नाही असे नियोजन करावे. प्रतिहेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावेत. त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खाऊन फस्त करतात. या अळीचा प्रादुर्भाव लष्करी अळीप्रमाणे एकच वेळी आढळून येतो म्हणून शेतातील पिकांमध्ये मादी पतंगाने अंडी घालू नये, याकरिता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५० मिली किंवा अझाडिरेक्टीन १५०० पीपीएम २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. प्रादुर्भाव २ अळ्या प्रतिमीटर ओळ अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळून आल्यास क्लोरपायरीफॉस २० टक्के ईसी ५० मिली किंवा क्लोरट्रनिपोल १८.५० टक्के ३.० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यक भासल्यास १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. अशी उपाययोजना केल्यास उत्पादनात नक्कीच वाढ होईल.



# बियाणे विधेयक शेतकरी हिताचे, परदेशी उत्पादनांना प्रवेश नसेल- कृषिमंत्री चौहान



नवी दिल्ली / वृत्तसंस्था

नवीन बियाणे विधेयक शेतकऱ्यांचे संरक्षण करेल. परदेशी उत्पादनांना भारतीय बाजारपेठेत अनियंत्रित प्रवेश मिळणार नाही. तर यामुळे देशांतर्गत नियामक व्यवस्था मजबूत होईल, असे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे. पुढील महिन्यात संसदेत हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. त्यात निकृष्ट दर्जाच्या बियाणे विक्री प्रकरणी दंडाची रक्कम ५०० रुपयांवरून ३० लाख रुपयांपर्यंत वाढण्याची तरतूद आहे. तसेच जाणीवपूर्वक अशा बियाण्यांची विक्री अथवा उत्पादन केल्यास ३ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

हे नवीन विधेयक १९६६ चा बियाणे कायदा आणि १९८३ बियाणे (नियंत्रण) आदेश यांची जागा घेईल. कृषिमंत्री चौहान यांनी या विधेयकाबद्दल व्यक्त केले जात असलेले आक्षेप फेटाळून लावले आहेत. हे बिजोत्पादन, पेरणी, संर्वधन, देवाणघेवाण आणि विक्री अधिकारांचे संरक्षण करेल, असा दावा त्यांनी केला आहे. यामुळे पारंपारिक बियाण्यांवर परिणाम होऊ शकते, असा गैरसमज पसरवला जात आहे. पण हे खरे नाही. या विधेयकातील तरतुदी शेतकरी आणि त्यांच्याकडील बियाणे वाणांना लागू होणार नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. शेतकरी स्वतः उत्पादन घेत असलेल्या बियाणांची पेरणी करु शकतात. शेतकरी इतर शेतकऱ्यांनाही बियाणे देऊ शकतात. शेतकऱ्यांनी पीक लागवडीच्या वेळी बियाणे एकमेकांना देऊन आणि त्यानंतर सव्वापट प्रमाणात बियाणे परत देण्याची पद्धत कोणत्याही अडथळ्याविना सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. बियाणे विधेयकांत शेवटची सुधारणा १९६० च्या दशकात करण्यात आली होती, जरी तेव्हापासून त्यात सुधारणा करण्याचे अनेक प्रयत्न करण्यात आले. या बियाणे विधेयकाच्या मसुद्यावर ९ हजार सूचना प्राप्त झाल्या असून, त्याचा कृषी मंत्रालयाकडून अभ्यास केला जात आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात हे विधेयक सादर करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील.

...तर दंडात्मक कारवाई


कंपन्यांकडून विक्री होत असलेली बियाणे तपासण्यासाठी विधेयकात ठोस उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. जर बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याचे निष्पन्न झाले अथवा ते उगवले नाही तसेच इतर कोणतीही समस्या निर्माण झाली तर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे चौहान यांनी सांगितले.

# कांदा पिकावरील अंथ्रेकनोज रोगाचे नियोजन

अंथ्रेकनोजएक बुरशीजन्य रोग असून याचे सगळ्यात प्रथम नोंद खरीप कांदा पिकातझाली होती. हा रोग प्रामुख्याने आंध्र प्रदेश राज्यातील कांदा पिकावर सातत्याने आढळत आला आहे. आपल्याकडेसुद्धा मागील १ते२ वर्षांपासून याचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. या लेखामध्ये आपण या रोगाविषयी माहिती घेऊ.

अंथ्रेकनोज रोगाची कारणे : हा रोग प्रामुख्याने पिकांच्या अवशेषांमधून जमिनीमध्ये आणि नंतर रोपाद्वारे किंवा कांदा द्वारे पसरतो. हा रोग प्रामुख्याने येणारा पाऊस किती तीव्रतेचा आहे त्याचे प्रमाण आणि पावसाचे वारंवार येणे यावर प्रामुख्याने अवलंबून असते. हा रोग प्रामुख्याने कांदा पिकावर जमिनीतून अटेक करतो. हवामानामध्ये जास्त प्रकारच्या आद्रता पंचवीस ते तीस सेंटीग्रेड तापमान असेल तेव्हा याचा प्रसार जास्त होतो. एकदा का या रोगाचा संसर्ग कांदा पिकावर झाला तर तो वाऱ्याच्या साहाय्याने, पावसासोबत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पसरतो. खास करून ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये ७८ ते ९० टक्के आर्द्रता असली आणि पाऊस सरासरी जर ३५ मिलिमीटर प्रत्येक आठवड्यात असेल तर हा रोग जास्त प्रमाणात पसरतो.

अंथ्रेकनोज रोगाची कांदा पिकावरची लक्षणे :




या रोगाच्या सुरुवातीला कांद्याच्या पातीवर सफेद रंगाचे ठिपके दिसतात. कालांतराने ते हलक्या पिवळट ढगांमध्ये रूपांतरित होतात व पुढे पूर्ण पातीवर पसरतात. या रोगाची तीव्रता जर वाढली तर पिकाची मान लांब होण्याचे सुरुवात होते. नंतर कांद्याची पात वेडीवाकडी होते. यालाच आपण पीळ्या रोग या नावाने ओळखतो. पुढे कालांतराने कांद्याच्या पातीची मान वाकते आणि जमिनीलगत होते. नंतर ही बुरशी काळा रंगाचे होते व रिंगसारखे लक्षणे पातीवर दाखवते. सुरुवातीला लक्षणे प्रामुख्याने शेतामध्ये घेतले पाणी साचलेले असते तिथे किंवा ट्रिपल किंवा स्प्रिंकलर च्या जवळ दिसतात.नंतर ते हळूहळू पणे पूर्ण शेतात होतात. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोपाची मुळे कमकुवत होतात व पिवळी पडतात. कंद पोसत नाही आणि काढणीनंतर कंद पाण्याचे प्रमाण जास्त वाढते.

रोगाचे एकात्मिक नियंत्रण व्यवस्थापन : सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पीक घेताना पिकांची फेरपालट करावी. पिकांचे अवशेष जमिनीत ठेवून येते काढून टाकावीत. गादीवाफ्यावर नर्सरी तयार करावी किंवा रोपांची पुनर्लागवड करावी. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या रोगाला प्रतिकारक असणारे जातींची लागवडीसाठी निवड करावी. जसे की भीमा श्वेता इत्यादी. बियाण्यास कार्बेन्डाझिम दोन ग्रॅम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करणे महत्त्वाचे आहे. पुनर्लागवडीच्या वेळेस रोपांनाकार्बन्दाझीम२.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात घेऊन रोपे त्या द्रावणामध्ये १० ते १५ मिनिटे बुडवून नंतर लागवड करावी. बियाणे टाकल्यानंतर किंवा रोपांची पुनर्लागवड केल्यानंतर तीन किंवा चार दिवसांनी ट्रायकोडर्मा एक किलो प्रति एकर या प्रमाणात पाटपाणी द्वारे ड्रेंचिंग करावे.

# देशाचे साखर उत्पादन दीडशे लाख टनांवर

पुणे : देशातील साखर उत्पादनाने दीडशे टनांचा टप्पा ओलांडला आहे. १५ जानेवारीअखेर उत्पादनात अव्वल क्रमांक कायम ठेवताना महाराष्ट्राने ६४.६० लाख टन साखर तयार केली आहे. महाराष्ट्राने दुसऱ्या क्रमांकावरील उत्तर प्रदेशपेक्षा तब्बल वीस लाख टन अधिक साखर उत्पादित केली आहे.

त्या खालोखाल, कर्नाटकात ३०.७० लाख टन साखर उत्पादन झाले आहे. देशभरात आतापर्यंत १७६३.७४ लाख टन ऊस गाळप झाला आहे. मागील हंगामात याच कालावधीत १४८४.०४ लाख टन ऊस गाळप झाला होता. यंदा गाळपात २७९.७० लाख टनांची वाढ असून, ती सुमारे १८.८५ टक्यांनी अधिक आहे. देशातील एकूण साखर उत्पादन १५८.८५ लाख टनांवर पोहोचले आहे. मागील वर्षी याच काळात हे उत्पादन १३०.६० लाख टन होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर उत्पादनात २८.२५ लाख टनांची वाढ नोंदली गेली असून ती २१.६३ टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे, ही वाढ केवळ महाराष्ट्रामुळेच झाली. गेल्या वर्षी या कालावधीत महाराष्ट्रात ४३ लाख टन साखर तयार झाली होती. यंदा ती ६४.६० लाख टनांवर गेली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत राज्यात सुमारे २१ लाख टनांनी साखरेच्या उत्पादनात वाढ झाली आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या अंदाजानुसार, यंदाच्या हंगामअखेर (२०२५-२६) देशातील एकूण साखर उत्पादन ३१५ लाख टनांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. मागील वर्षी हे उत्पादन २६१.८० लाख टन होते. गेल्या वर्षीच्या तुलनेत यात ५३.२० लाख टनांची वाढ होऊ शकते. तसेच, गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर निर्मितीत २०.३२ टक्के वाढ होऊ शकते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करा

धाराशिव । प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची त्वरित बैठक घेऊन आदर्श आचारसंहितेची तातडीने प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत श्री. पुजार बोलत होते. या बैठकीला सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) श्रीमती स्वाती शेंडे,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण धरमकर, संतोष राऊत, अरुणा गायकवाड, श्रीकांत पाटील, ओंकार





देशमुख, दत्तू शेवाळे, गणेश शिंदे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे, वीज वितरणचे कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे यांच्यासह सर्व तहसीलदार व सर्व गटविकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. पुजार म्हणाले की, निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी.नामांकनपत्रे दाखल करताना गोंधळ होणार नाही याची माहिती राजकीय पक्षांच्या बैठकीत द्यावी. विविध राजकीय पक्षांच्या रॅलीमध्ये सहभागी असलेल्या वाहनांची नोंद घ्यावी.

सर्व राजकीय पक्षांना समानतेची वागणूक द्यावी. आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. नामनिर्देशनपत्रे या निवडणुकीत ऑफलाइन दाखल करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. या निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी समिती, वाहतूक व्यवस्थापन समिती,कायदा व सुव्यवस्था समिती,प्रसारमाध्यम व संदेश वहन समिती,नियंत्रण कक्ष, जिल्हास्तरीय खर्च नियंत्रण समिती व जनजागृतीसाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

### आदर्श मतदान केंद्र असणार

या निवडणुकीसाठी १३०८ मतदान केंद्रांवर मतदार होणार आहे. आठही तालुक्यात प्रत्येकी एक आदर्श मतदान केंद्र असेल. अशा मतदान केंद्रांची संख्या २० आहे. प्रत्येक तालुक्यात प्रत्येकी १ महिला व प्रत्येकी १ दिव्यांग मतदान केंद्र राहणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रामध्ये भूम तालुक्यातील पाटसांगवी व लोहारा तालुक्यातील धानुरी येथील मतदान केंद्राचा समावेश आहे. अशी माहिती श्रीमती शेंडे यांनी सादरीकरणातून यावेळी दिली.

# पहिल्याच मनपा निवडणुकीत वंचितचे चार शिलेदार जिंकले



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या वंचित बहुजन आडीने मनपाच्या पहिल्याच निवडणुकीत प्रभाग तीनमध्ये चमक दाखवत चार शिलेदार जिंकून आणले.

या प्रभागातील अनेक मुरब्बी उमेदवारांना पहिल्याच प्रयत्नात विरोधकांना घरचा रस्ता दाखवला आहे. यापूर्वी अमित भुईगळ यांनी भारिपच्या वतीने निवडणूक लढवून मैदान मारले होते. त्याचबरोबर अफसर खान यांनी काँग्रेसकडून मैदान मारलेले होते. दरम्यान, दोन महिला उमेदवार या नवीन असूनही मैदान मारण्यात यशस्वी झाल्या आहेत. वंचित बहुजन आघाडीची ही महानगरपालिकेची पहिलीच निवडणूक आहे.यात त्यांनी दमदार यश मिळविले. या निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक तीनचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अमित सुधाकर भुईगळ (अ), जरीना जावेद कुरेशी (ब), करुणा मेघानंद जाधव (क) आणि अफसर खान यासीन खान (ड) या चार उमेदवारांनी दिग्गजांना मागे सारत निवडणूक जिंकली. दरम्यान, या विजयानंतर कार्यकर्त्यांत प्रचंड उत्साही वातावरण पहावयास मिळाले.

# बीड ही साधुसंत महात्म्यांची भूमी आहे :-योगीराज महाराज



बीड

वारकरी संप्रदायाचा पाया रचनेची प्रेरणा संत निवृत्तीनाथ महाराजांना ज्यांनी करून दिली ते गहिनीनाथ महाराज यांचा गहिनीनाथ गड या बीडच्या भूमीत आहे नाथ नातं संप्रदायाचा पाया ज्यांनी घातला ते मच्छिंद्रनाथ यांची संजीवन समाधी , जालिंदर नाथांची समाधी याच भूमीत आहे,संतश्रेष्ठ नगद नारायण महाराज, बंकट स्वामी महाराज , संत मन्मथ स्वामी महाराज, सुफी संत शहेनशहावली महाराज,संत वामनभाऊ महाराज ,संत भगवान बाबा ,संत माऊली दादा चाकरवाडीकर ,संत किसन बाबा व शांती ब्रह्म संत नवनाथ बाबा महाराज ''बीड हि संत महात्म्यांची भूमी आहे''असे श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी विवेचनात म्हटले

एखाद बीज स्वतःला जमिनीत गाढून घेत तेव्हा त्याचा वटवृक्ष होतो तस गुरुवर्य किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी गोरक्षनाथ टेकडी साठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलं , आयुष्य वेचलं म्हणून आज हा श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी चा वटवृक्ष झाल्याचा दिसून येतो मनुष्याचा नेहमी बोलण्यावर ताबा असावा अनेक उपद्रव तुमच्या बोलण्याने होतात त्या पेक्षा न बोललेलं बरं म्हणून माणसाचा बोलण्यावर नियंत्रण असावे शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज हे आदर्श समोर ठेवून माणसाने बाबांप्रमाणे कमी बोलावं कमी बोलण्याने मन शांत राहते माणसाने मान अपमान याच्या पुढे जावे एखाद्याने मान दिला जास्त हाळूऊन जाऊ नये व एखाद्याने अपमान केला तर दुःख करून जो व्यक्ती मान अपमानाचा समान लेख तोच सुखी होतो असे अभंग विवेचन करताना ह भ प योगीराज महाराज गोसावी यांनी केले यावेळी कीर्तन सेवेत किर्तन साथ गायनाचार्य वादन साथ मृदंगाचार्य टाळकरी माळकरी विणेकरी भजनी मंडळी यांच्या समवेत असंख्य भाविक भक्त श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे कीर्तन सेवेस उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १२५/२०२६

CNR No. MHBI02000019182026

**(मार्फत ॲड. आर. डी. राउत)**

**लक्ष्मीबाई दावजी भांडवले व ईतर ४ वि. निरंक**

अर्जदार : १. लक्ष्मीबाई भ्र. दावजी भांडवले , वय ६० वर्षे, धंदा-घरकाम, स. बार्शी नाका, तेलगांव रोड, बीड ता. जि. बीड, २. अदिनाथ पि. दावजी भांडवले, वय-५४ वर्षे, धदा-शेती, रा. वरील प्रमाणे, ३. गणेश पि. दावजी भांडवले , वय ४५ वर्षे, धदा-शेती, रा. वरील प्रमाणे, ४. अशोक पि. बिभीषण भांडवले, वय २३ वर्षे, धंदा-शेती, रा. वरील प्रमाणे, ५. किशोर पि. बिभीषण भांडवले, वय-१७ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. वरील प्रमाणे अज्ञान, अ.पा.क. आज्जी अर्जदार क. १.

विरुष्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात दावजी पि. मारूती भांडवले याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत दावजी पि. मारूती भांडवले याचा मृत्यु दिनांक २२/११/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले व अर्जदार क्र. ४ व ५ हे मयताचे नातु आहेत. मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत तसेच मयतास अजुन एक मुलगा नामे विभीषण दावजी भांडवले हा यापुर्वीच मयत झालेला असून अर्जदार क्र. ४ व ५ हे त्याची मुले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत दावजी पि. मारूती भांडवले यांचे मृत्युनतर वरील अर्जदार याना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २६/०२/२०२६ आज दिनाक १७ माहे जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.


स्वाक्षरित
**क. लिपीक**

**आदेशावरुन,**
स्वाक्षरित
**अधिक्षक /**
**सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

# धनगर आरक्षणासाठी पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील धनगर बांधव मुंबईकडे रवाना होणार

लिंबागणेश । प्रतिनिधी

धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे हे दि. २१ जानेवारीपासून मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या या न्याय्य मागणीला पाठिंबा देण्यासाठी मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज दि. १७ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मुख्य प्रवेशद्वारावर धनगर समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधव मुंबईकडे रवाना होणार असल्याची घोषणा



करण्यात आली.

यावेळी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ''येळकोट येळकोट जय मल्हार'', ''जय मल्हार बोलो, मुंबई चलो'', ''दिपकभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ है'', ''आरक्षण आमच्या हक्काचं आहे, नाही कोणाच्या बापाचं'' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडण्यात आला. दिपकभाऊ बो-हाडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणाऱ्या धनगर समाजाच्या आरक्षणासाठीच्या न्याय मागणीला मराठा समाजासह अठरापगड जातीतील समाजबांधवांचा जाहीर पाठिंबा असून, सर्व समाजबांधवांनी या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड तसेच नेकिनूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठविण्यात आले आहे. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी, रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळासाहेब मुळे, बाळासाहेब मोरे पाटील, अनंतकाका मुळे, हरिओम क्षीरसागर, संदीप मुळे, शहादेव धलपे, गणपत तागड, रामदास मुळे, रामचंद्र मुळे,महावीर मुळे, संतोष वाणी, विनायक वाणी, संजय सुकाळे, प्रविण मुळे, जीवन मुळे, रोहन तागड, रामराजे मुळे, नवनाथ मुळे, केशव गिरे, कल्याण कोकाटे, दत्ता मुळे, आप्पा मुळे अमोल पितळे, बंडू ढगारे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंद्रभान राठोड यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील रामनगर छोटेवाडी येथील ज्येष्ठ नागरिक, माजी सरपंच तथा बंजारा समाजाचे मार्गदर्शक चंद्रभान राठोड (वय ८३) यांचे आजारपणामुळे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने रामनगर तांडा परिसरासह संपूर्ण बंजारा समाजावर शोककळा पसरली आहे. चंद्रभान राठोड यांनी आपल्या कार्यकाळात रामनगर तांड्याचे सरपंच म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने काम केले. साधेपणा, प्रामाणिकपणा व दूरदृष्टी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. समाजहित हाच त्यांच्या जीवनाचा मुख्य उद्देश होता. पदाचा गैरवापर न करता त्यांनी त्या पदाचा उपयोग गावाच्या विकासासाठी केला.



स्थानिक तसेच तालुका व जिल्हा पातळीवरील लोकप्रतिनिधींशी असलेल्या सुसंवादाच्या माध्यमातून त्यांनी विविध विकासकामे, शासकीय योजना व सुविधा तांड्यापर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. गोरगरिबांना मदत, गरजू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि अडचणीत असलेल्या कुटुंबांना आधार देणे हे त्यांच्या सामाजिक कार्याचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या निधनाने समाजाने एक मार्गदर्शक नेतृत्व गमावले असून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातू, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# अपघातातील जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

परभणी । प्रतिनिधी



मोटारसायकल व सिमेंट वाहतूक करणाऱ्या ऑटोच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तालुक्यातील मानोली येथील युवकाचा शुक्रवारी (दि.१६) सकाळी ९ च्या सुमारास उपचारादरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटलमध्ये दुर्दैवी मृत्यू झाला.

किरण संजय भांड वय २१ असे त्या दुर्दैवी युवकाचे नाव असून शहराबाहेरील बायपास ला जाणाऱ्या संत सावता माळी टी पॉईंटवर सायंकाळी ५.३० च्या सुमारास मोटरसायकलला (एम एच २२ जे ९४५९) सिमेंट वाहतूक करणाऱ्या पिवळ्या रंगाच्या पियाजिओ ऑटोने जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला होता. धडक दिल्यानंतर ऑटो चालक घटनास्थळावरून फरार झाला होता. परिसरातील नागरिकांनी तत्काळ जखमीला मदत करत रुग्णवाहिका बोलावली. किरण भांड याला प्रथम मानवत येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यास परभणी येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरला हलविण्यात आले होते. परंतु, उपचार सुरु असताना आज सकाळी ९ च्या सुमारास त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. किरण भांड हा डी फॉर्मसीच्या दुसऱ्या वर्गात शिकत होता. आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या संजय भांड यांचा तो एकुलता एक मुलगा होता. त्याच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी असा परिवार आहे.

# दोन महिन्यांत निधी खर्च न केल्यास कारवाई होणार

## जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचा कर्मचाऱ्यांना इशारा

हिंगोली । प्रतिनिधी

जिल्ह्यात एकीकडे निधी नसल्याचे सांगितले जात आहे तर दुसरीकडे १५ व्या वित्त आयोगाचा ग्रामपंचायत स्तरावरील ६० कोटींचा निधी का पडून आहे, असा सवाल करीत सदर निधी पुढील दोन महिन्यांत खर्च करा अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी समन्वय समितीच्या बैठकीत दिला.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या सभागृहात त्यांनी बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाणे, केशव गड्डापोड, विजय बोराटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, लघुसिंचन विभागाच्या कार्यकारी अभियंता प्रियांका राजपूत, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, संदीप सोनटक्के, आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त





गीता गुट्टे यांच्यासह गटविकास अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी सर्व विभागांचा आढावा घेतला. पंचायत विभागाचा १५ व्या वित्त आयोगाचा ग्रामपंचायतस्तरावरील ६० कोटी रुपयांचा निधी अखर्चित असल्याचे दिसून अल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. एकीकडे निधी नाही अशी ओरड असताना दुसरीकडे कोट्यवधींचा निधी का अखर्चित आहे असा सवाल त्यांनी केला. सदर निधी पुढील दोन महिन्यांत खर्च करावा. काही दिवसांतच ग्रामपंचायतींना भेटी देणार आहे. त्या ठिकाणी कामे सुरू नसल्यास दोषींवर कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला. या शिवाय दिव्यांगांचा पाच टक्के निधी तातडीने खर्च करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आगामी काळात ग्रामीण भागातून पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासाठी जल जीवन मिशन योजने अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनेची अपूर्ण कामे गतीने पूर्ण करावीत सदर कामे करतांना कामाचा दर्जा राखण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. या सोबतच वैयक्तिक लाभाच्या योजनांची कामे तातडीने पूर्ण करावी. घरकुल योजना, सिंचन विहीर, गोठ्यांची कामे तातडीने पूर्ण झाली पाहिजेत याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. हिंगोली जिल्हा परिषदेत सकाळी अकरा वाजता बैठक सुरू करण्यात आली. प्रत्येक विभागाचा मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांनी योजनानिहाय आढावा घेतला.

# अहिल्यानगर शहरात घरफोडी; सराईत आरोपींकडुन मुद्देमाल हस्तगत

अहिल्यानगर। प्रतिनिधी

सावेडी, अहिल्यानगर शहरामध्ये घरफोडी चोरी करणारा सराईत आरोपींकडुन १९,४२,४७५/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगरची कारवाई प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, दिनांक १३/१२/२०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वा ते दिनांक १६/१२/२०२५ रोजीचे १२/०० वा.चे दरम्यान फिर्यादी हे कुटुंबासह जयपुर येथे नातेवाईकांचे कार्यक्रमास गेले होते त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराच्या मागील दरवाजाचे लॉक कशानेतरी तोडुन आत प्रवेश करुन घरामध्ये ठेवलेले १४,७५,०००/-रु किमतीचे सोने, डायमंड, चांदी व रोख रक्कम चोरुन नेले आहे. सदर घटनेबाबत फिर्यादी श्री अशोककुमार विजयकुमार



अग्रवाल रा. बंगला क्र.०६ विराज कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. ११९१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मा. श्री सोमनाथ घार्गे साहेब, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर शहरामध्ये घरफोडीचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते. सदर आदेशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रविंद्र पांडे, सुरेश माळी, गणेश धोत्रे, शाहिद शेख, फुरकान शेख, दिपक घाटकर, बिरप्पा करमल, सतिष भवर, रोहीत येमुल, अमृत आढाव, प्रकाश मांडगे, प्रशांत राठोड, भाग्यश्री भिटे, चालक भगवान धुळे यांचे पथक तयार करुन सदर पथकास घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना करण्यात आले होते. नमुद पथकाने गुन्ह्यातील आरोपींबाबत गोपनिय माहिती व व्यवसायीक कौशल्याचे आधारे माहिती संकलित करुन आरोपीचे शोध घेत असतांना पथकास सदरचा गुन्हा रमेश कुंभार रा. वर्तनगनर ठाणे याने केले असल्याची माहिती मिळाली. दिनांक १६/०१/२०२६ रोजी पथकाने नमुद आरोपीचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव १) रमेश महादेव कुंभार वय ४९ रा. अमाप रेसीडेन्सी, फलॅट नं.२०३, कशेळी, ठाणेअसे असल्याचे सांगीतले त्यास वरील गुन्हे बाबत विचारपुस करता त्याने सदरचा गुन्हा मी व माझे साथीदार २) आशीष शिंदे रा. बारामती ता.बारामती जि. पुणे (फरार) अशांनी मिळुन केल्याची कबुली दिली आहे. त्यानंतर ताब्यातील आरोपीचे ताब्यातुन व आरोपीचे सांगणे प्रमाणे १५,११,४७५/- रु कि.ची १०४.६७० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड, ४,००,०००/- रु की.ची मारुती सुझुकी कंपनीची ४ मॉडेलची कार, ३१,०००/- रु की.चे सिल्व्हर रंगाचे मोठे ३१ मोती, एक कटर, मोठे कटर असा एकुण १९,४२,४७५/- रु कि.चा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
रविवार दि.१८ जानेवारी २०२६ | ६

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या झंझावाती नेतृत्वाचा करिश्मा

## सभा घेतलेल्या ठिकाणी भाजपा अव्वल; जनतेने विकासाला कौल दिला – ना.मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा स्टार प्रचारक ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाचा करिश्मा महापालिका निवडणुकीतही दिसून आला. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या होत्या त्याठिकाणी भाजप अव्वल ठरला आहे.

राज्यातील महापालिका निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून सर्वत्र जल्लोष साजरा होत आहे. प्रदेश कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना. पंकजाताई मुंडे व अन्य नेत्याच्या उपस्थितीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सभा घेतलेल्या ठिकाण विजय

ना. पंकजाताई मुंडे हया नांदेडच्या प्रभारी होत्या, याठिकाणी त्यांनी वेगवेगळ्या प्रभागात सभा घेतल्या होत्या, तिथे भाजपने बहुमतासह घवघवीत यश संपादन केले. याशिवाय त्यांनी जिथे जिथे सभा घेतल्या त्या पुणे, पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर, इचलकरंजी, पनवेल, कल्याण, नाशिक आदी ठिकाणी भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत महा पालिकेवर झेंडा फडकविला. या यशाबद्दल ना. पंकजाताईंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



जनतेने विकासाला कौल दिला

या निवडणुकीत भाजपने जोरदार यश मिळवले आहे, मला खूप आनंद होत आहे. आम्हाला ऐतिहासिक विजय मिळेल हा विश्वास होताच. जनतेने विकासाला कौल दिला आहे,विजयाचं श्रेय देवाभाऊंना दिलं पाहिजे अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी निवडणूक निकालानंतर प्रतिक्रिया दिली.

# हालगे गल्ली परिसरात रात्रीच्या चोऱ्यांचा सुळसुळाट; नागरिक व व्यापारी भयभीत

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील मोंढा भागात असलेल्या हालगे गल्ली व घरणीकर रोड परिसरात गेल्या चार-पाच दिवसांपासून रात्रीच्या वेळेस चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यामुळे या भागातील रहिवासी व व्यापारी वर्ग प्रचंड त्रस्त झाला असून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



या परिसरात श्री मंगलनाथ बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, वैद्यनाथ बँक, पूर्णवादी बँक, मराठवाडा ग्रामीण बँक यांसह मोठी व्यापारी पेठ आहे. अशा गजबजलेल्या व संवेदनशील भागात चोऱ्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने व्यापाऱ्यांसह नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे प्रभाग क्रमांक १३ अंतर्गत येणाऱ्या हालगे गल्ली परिसरात सलग चार दिवसांपासून चोरट्यांचा मुक्त संचार सुरू आहे. चोर घरांवर पत्रे चढत असून दुचाकी व चारचाकी वाहनांमधील पेट्रोल चोरीस जात असल्याच्या घटनाही वारंवार घडत आहेत.


या पार्श्वभूमीवर परळी पोलिसांनी या भागाकडे तातडीने लक्ष देऊन रात्रीची गस्त वाढवावी व चोरट्यांना जेरबंद करावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते गजानन हालगे यांनी केली आहे.

तसेच प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे व सार्वजनिक दिवे (स्ट्रीट लाईट) या परिसरात तात्काळ बसवावेत, अशी मागणीही नागरिक व व्यापाऱ्यांकडून जोर धरू लागली आहे. चोरट्यांचा वाढता धुमाकूळ थांबवण्यासाठी प्रशासन आणि पोलिस यंत्रणेने तातडीची पावले उचलावीत, अन्यथा नागरिकांत असंतोष उफाळून येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# डॉ.अमोल गिते यांची राज्यकार्यकारणीवर नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

दी. १६/०१/२०२६ रोजी आय एम एस सचिव बीड डॉक्टर अमोल गिते यांची राज्याच्या सांस्कृतिक मंडळाच्या राज्यकार्यकारणी सदस्य जेष्ठ मार्गदर्शन महानून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्य अध्यक्ष डॉ संतोष कुलकर्णी व सचिव डॉ विक्रांत देसाई यांनी पत्राद्वारे कळवली असून या बद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो असे डॉ अमोल गिते म्हणाले,व येणारा काळात राज्य स्तरावर देखील ऊल्लेख नीय कार्य करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच या निवड़ीबद्दल डॉ गिते यांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.




# रामनगरकरांनी वडाचे झाड वाचविले!

## धुळे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गात तुटणाऱ्या वडाचे केले प्रत्यारोपण

बीड । प्रतिनिधी

धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रामनगर येथे उड्डाणपुलाचे काम सुरू असताना गावातील अनेक वर्षांपासून उभे असलेले भलेमोठे वडाचे झाड तोडण्याची वेळ आली होती. विकास गरजेचा आहे, याची जाणीव गावकऱ्यांना होती; मात्र निसर्गाचा नाश करून होणारा विकास रामनगरकरांना मान्य नव्हता. त्यामुळे कोणतीही आंदोलनाची भाषा न वापरता, कोणतीही टोकाची भूमिका न घेता, फक्त जाणीव, जबाबदारी आणि निसर्गप्रेमाच्या भावनेतून गावकरी एकत्र आले. या सामूहिक प्रयत्नांतून सदर वडाचे झाड तोडण्याऐवजी गावातील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे त्याचे सुरक्षित प्रत्यारोपण करण्यात आले.

कित्येक वर्षे माणसांना सावली देणारे, पक्ष्यांना आसरा देणारे हे झाड आज नव्या ठिकाणी पुन्हा जगण्यासाठी उभे करण्यात आले आहे. लवकरच या वडाच्या झाडाला पुन्हा पालवी फुटेल, त्याच्या सावलीत माणसे विसावतील,



मुले खेळतील आणि पक्षी घरटी बांधतील, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. या उपक्रमासाठी गावातील ग्रामस्थांसह उड्डाणपुलाचे काम करणारी मे. कालूवाला कन्स्ट्रक्शन प्रा. लि. (हरियाणा) या कंपनीने मोलाचे सहकार्य केले. प्रत्यारोपणानंतर झाडाची योग्य वाढ व्हावी यासाठी नियमित पाण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. यावेळी पत्रकार केशव कदम यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज जिथे झपाट्याने वृक्षतोड सुरू आहे, तिथे आम्ही पहाडासारखे एक झाड वाचवले आहे. ही फक्त एका झाडाची गोष्ट नाही, तर भावी पिढीसाठी दिलेली श्वासाची हमी आहे, अशी भावना आज गावातील प्रत्येक ग्रामस्थांची आहे.

एक झाड वाचविल्याचा आम्हा रामनगरकरांना मनापासून अभिमान असून, हा उपक्रम इतर गावांसाठीही नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे.

– केशव कदम,पत्रकार, बीड

# चोवीस तासात अल्पवयीन पीडितेचा शोध

## अनैतिक मानवी वाहतूक शाखेने आरोपीला घेतले ताब्यात

बीड । प्रतिनिधी

पोस्टे बीड ग्रामीण गुन्हा रजिस्टर नंबर २०७/२०२५ कलम १३७(२) भान्यास हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे दिनांक १५/०१/२०२६ रोजी दुपारी वर्ग झाला होता. पोउपनि पल्लवी जाधव यांनी मूळ फाइल चे अवलोकन केले. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांची भेट घेऊन गुन्ह्या संदर्भाने चौकशी केली. मिळालेल्या तांत्रीक माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करुन पीडित मुलगी व आरोपी रोशन गवई रा. सोनाळा ता. संग्रामपुर जि. बुलडाणा यांचे वास्तव्य बुलढाणा जिल्ह्यात असल्याचे समजले. त्यावरून रात्री ९ वाजता ची टीम एसपी सर यांच्या आदेशाने बुलढाणा जिल्ह्याकडे रवाना झाली. दिनांक १६ जानेवारी रोजी सकाळी ३ वाजता, मिळालेल्या माहितीनुसार टीम सोनाळा तालुका संग्रामपुर जि. बुलढाणा येथे पीडित व आरोपीचा शोध घेत त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी पोहचली व त्यांना ताब्यात घेतले. पोस्टे सोनाळा येथे त्यांची नोंद करून, टीम त्यांना घेवून बीड कडे रवाना झाली. ◀◀ पान ३ वर



# अल फलाह कमिटीच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा

## सामुदायिक विवाह सोहळ्यात २७ नवदाम्पत्याचा विवाह

माजलगाव । प्रतिनिधी

अल फलाह कमिटी, माजलगाव यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि १७ जानेवारी शनिवार रोजी सामूहिक विवाह सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या वर्षी एकूण २७ नवदांपत्यांचा विवाह सोहळा अत्यंत साधेपणा, धार्मिक विधी आणि सामाजिक बांधिलकी जपत पार पडला. या उपक्रमामुळे गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा आधार मिळाला असून समाजात एक सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

या मंगल प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हजरत मौलाना कारी अहेमद अली साहब यांची विशेष उपस्थिती लाभली. मौलाना साहब यांनी आपल्या प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि मार्गदर्शक भाषणातून विवाहाचे धार्मिक, सामाजिक व नैतिक महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. त्यांनी विवाहाला केवळ एक सोहळा न मानता तो दोन कुटुंबांना आणि संपूर्ण समाजाला एकत्र बांधणारा पवित्र बंध असल्याचे सांगितले.




# किल्ला मैदान येथील डाकबंगला बीड पालिकेने तात्काळ सुरू करावा –पठाण

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील किल्ला मैदान बलभीम कॉलेज जवळील निजाम कलीन न.प.मालकीचा डाकबंगला तात्काळ दुरूस्त करुन सुरू करावे असे निवेदन मा.प्रेमलता पारवे साहेबा, अध्यक्ष न.प.बीड व मुख्याधिकारी यांना समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी दिले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील किल्ला मैदान बलभीम कॉलेज जवळील असलेला निजाम कालीन न.प.मालकीचा डाकबंगला अनेक दशका पासून जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध होता. या डकबंगल्या मध्ये बीड शहरातील अनेक श्रीमंत व गरीब लोकांचे विवाह समारंभ, साखरपुडे संपन्न झाले तसेच या डाकबंगल्यामध्ये अनेक राजकीय व सामाजीक लोकांचे सांस्कृतिक कार्यक्रम या डाकबंगल्यामध्ये पारपाडले गेले आहेत. निजाम कालीन बांधलेला डाकबंगला पाडुन त्या जागेवर नवीन बांधकाम करुन नगर परिषद बीड यांनी भाडेतत्वार खाजगी व्यक्तीला चालविण्यासाठी दिले होते नगर परिषद बीड स्वच्छता विभागाकडुन वेळोवेळी स्वच्छता होत ◀◀ पान ३ वर



# महादेव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. अजितदादा पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष मा.खा. सुनीलजी तटकरे साहेब यांच्या आदेशाने तसेच माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व माजी मंत्री मा. प्रकाशदादा सोळंके, युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके व जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या मान्यतेने वडवणी तालुक्यातील पुसरा येथील रहिवासी श्री. महादेव गणपतराव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



महादेव सावंत हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व असून वंचित, गोरगरीब व निराधार जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. अन्यायाविरोधात प्रसंगी शासनाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची भूमिका त्यांनी वेळोवेळी घेतली आहे. यापूर्वी त्यांनी भाजपमध्ये कार्यरत राहून पक्षवाढीसाठी तसेच जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले असून, या कार्यामुळे ते जनतेतील विश्वासार्ह नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत.

# बीडमध्ये संविधान महोत्सव कार्यक्रमांची रेलचेल

बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने बीड शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे शनिवार व रविवार असे दोन दिवस हा महोत्सव रंगणार आहे. शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता भारतीय संविधानाच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासावर आधारित 'महासूर्य' हे भव्य महानाट्य सादर होणार आहे. या महानाट्याचे लेखन व दिग्दर्शन डॉ. सुनील रामटेके यांनी केले असून, संगीत भूषेश सवाई यांचे आहे. तब्बल ४० कलाकारांचे सशक्त सादरीकरण या महानाट्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

त्यानंतर रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता 'संविधानाचा जागर' हा जागृतीपर सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक चेतन चोपडे आणि अजय देहाडे यांच्यासह सहकलाकार संविधानातील मूल्ये, समता, स्वातंत्र्य व बंधुता यांचा ◀◀ पान ३ वर

# गेवराईत टायर पेटवले,बीडमध्ये घोषणाबाजी करत सकल धनगर समाजाचा आक्रोश

## दिपक बोराडे यांना अटक केल्याच्या निषेधार्थ आंदोलन

बीड । प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटीचे आरक्षण मिळावे यासाठी जालना येथील दिपक बोराडे यांनी मोठे आंदोलन उभा केल्यानंतरही मुंबईतील आझात मैदान येथे दि. २१ जानेवारी रोजी अमरण उपोषण करणार असल्याने दिपक बोराडे यांना दि. १७ जानेवारी सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान पोलिसांनी अटक केली असून त्याचे पडसात संपूर्ण महाराष्ट्रात पडत असल्याचे दिसून येत असताना बीड व गेवराई येथे सकल धनगर समाजाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.



गेल्या ७० वर्षांपासून धनगर समाजाला एसटी आरक्षणापासून वंचित ठेवलेले आहे. धनगर आरक्षणासाठी जालना येथे संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातील धनगर समाज एकवटल्यानंतरही सरकारला जाग येत नसल्याने धनगर समाज आरक्षणाचे मल्हार योद्धे दिपक बोराडे हे दि. २१ जानेवारी रोजी मुंबई येथील ◀◀ पान ३ वर

# उसाच्या फडातून थेट सीमेपर्यंत:विकास शिंदे पाटील यांची बीएसएफमध्ये निवड!

वडवणी । प्रतिनिधी

काही स्वप्नं उशांवर नाही, तर ऊसाच्या फडावर घाम गाळत गाळत पाहिली जातात काही यशोगाथा पुस्तकांत नाहीत, त्या आईच्या फाटलेल्या पायात, उन्हाने करपलेल्या हातांत आणि अश्रूंमध्ये लिहिलेल्या असतात. मोठा भाऊ आकाश ह्याची पण त्याला खूप साथ होती तसेच त्याच्या सोबतच्या सर्व मित्रांची साथ राहिली.

वडवणी येथील विकास बबन शिंदे पाटील यांची बॉर्डर सेक्युरिटी फोर्स (इडऋ) मध्ये निवड झाली आणि एका गरीब घरात आज दुःखाचं दार कायमचं बंद झालं. ही निवड म्हणजे नोकरी नव्हे, तर आईच्या आयुष्यभराच्या कष्टांचा सन्मान आहे. विकास लहान असतानाच वडिलांचे छत्र हरपले.



घरात अन्न नव्हते, साधी वही-पेन घेणंही अवघड होतं.

त्या दिवसापासून आईने स्वतःचं आयुष्य बाजूला ठेवलं

कडाक्याच्या थंडीत, पावसात, रणरणत्या उन्हात ऊसतोडीसाठी कारखान्यावर मजुरी केली. पायांना फोड, हातांना जखमा, अंगात ताप – तरीही ती थांबली नाही, कारण तिच्या डोळ्यांत फक्त एकच स्वप्न होतं – माझा मुलगा मोठा होईल! आई ऊस तोडत असताना विकास अभ्यास करत होता. आई रडत होती, तो धीर धरत होता. आईने भूक सोसली, पण मुलाचं शिक्षण थांबू दिलं नाही. आणि आज तोच मुलगा देशाच्या सीमेवर उभा राहण्यासाठी सज्ज झाला आहे.

या भावनिक क्षणी वार्ड क्रमांक १६ चे नगरसेवक नागेश डिगे, वैजिनाथ डिगे, दिगांबर म्हेत्रे, गुरुप्रसाद ◀◀ पान ३ वर

# 'स्वाराती'तील सुविधांचा खा.बजरंग सोनवणे घेणार आढावा

## १९ जानेवारीला सर्व वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी राहणार उपस्थित



अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रुग्णसेवा, आरोग्य सुविधा, मनुष्यबळ, औषध साठा, पायाभूत सुविधा तसेच प्रलंबित विविध प्रश्नांबाबत खा.बजरंग सोनवणे सविस्तर आढावा घेणार आहेत. सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

बीड लोकसभा मतदारसंघाचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांच्या पुढाकारातून सदर बैठक आयोजित करण्यात येत असून, यासंदर्भात रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास पत्राद्वारे सूचनाही दिल्या आहेत. सदर बैठकीस संबंधित विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासनातील जबाबदार अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्यसेवा मिळावी, रुग्णालयातील सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात यावा, या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. या बैठकीत रुग्णसेवेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात येणार असून, आरोग्य यंत्रणेमधील समन्वय अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यात, आरोग्य, शिक्षण, दळवळण अशा विषयांना कायम महत्व दिलेले आहे. आरोग्य विभागातील अडचणी सोडविण्यासाठी ते तत्पर असतात. जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रात देखील ते सरप्राईज व्हिजीट करत असतात. यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क असते. जिल्ह्यातील रूग्णांना दर्जेदार उपचार, सुविधा मिळाव्यात यावर खा.बजरंग सोनवणे यांचा भर आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात महिला दिग्दर्शकांचा ठसा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) यावर्षी महिला दिग्दर्शकांची खूप मोठी संख्या असून, १३० चित्रपटांपैकी ४५ महिला दिग्दर्शकांचे चित्रपट महोत्सवात पाहायला मिळणार आहेत. जागतिक चित्रपट स्पर्धा, ग्लोबल सिनेमा, भारतीय चित्रपट आणि माहितीपट अशा विविध विभागांतील चित्रपटांचा समावेश आहे.

महोत्सवाच्या जागतिक चित्रपट स्पर्धा विभागात सहा महिला दिग्दर्शिकांचे चित्रपट दाखवले जाणार आहेत. बेल्जियमच्या दिग्दर्शिका आणि पटकथा लेखिका लॉरा वँडेल यांचा 'ॲडम्स सेक', कॅनेडियन दिग्दर्शिका सोफी रोमवारी यांचा 'ब्लू हेरॉन', फ्रेंच दिग्दर्शिका पॉलीन लोक्वेस यांचा 'निनो', हंगेरीच्या दिग्दर्शिका इल्डिको एन्येदी यांचा 'सायलेंट फ्रेंड', ऑस्ट्रियन दिग्दर्शिका एल्सा क्रेम्सर यांचा 'व्हाइट स्नेल', 'धीस इज माय नाईट' हे चित्रपट पाहायला मिळणार आहेत. ग्लोबल सिनेमा विभागात महिला दिग्दर्शिकांच्या २९ चित्रपटांची निवड झाली आहे. त्यात 'लूझ' (फ्लोरा लाऊ), 'पिंच' (उत्तरा सिंग), 'कारवाँ' (झुजाना किचनेरोव्हा), 'नो वे बॅक' (नथाली नाजेम) आणि 'साउंड ऑफ फॉलिंग' (माशा शिलिन्स्की) यांसारखे चित्रपट वास्तविक घटना, कौटुंबिक नाती, सामाजिक तणाव आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या विषयांना स्पर्श करतात. आसामच्या दिग्दर्शिका मंजू बोरा यांचा 'मर्डर्स टू क्लोज-लव्ह टू फार' हा भारत-इस्रायल सहनिर्मितीतील चित्रपट, प्रेमसंबंध, हत्या आणि राजकीय संघर्ष यांवर आधारित आहे. हा चित्रपट मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वोलमन यांनी संयुक्तपणे दिग्दर्शित केला असून, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाने (एनएफडीसी) या चित्रपटाला पाठबळ दिले आहे.

महाराष्ट्रातील दिग्दर्शिका ईशा पुंगलिया यांचा 'ओस्लो : अ टेल ऑफ प्रॉमिस' हा माहितीपट, तर जिजीविशा काळे यांचा 'मदरहूड-तिघी' हा चित्रपट मराठी चित्रपट स्पर्धा विभागातून निवडण्यात आला आहे. यावर्षी पिफमध्ये महिला दिग्दर्शकांची संख्या वाढणे ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. भारतीय चित्रपट विभागात दिग्दर्शिका शिवरंजिनी जे. यांचा मल्याळम चित्रपट 'व्हिक्टोरिया' दाखवला जाणार आहे. याच विभागात तनुश्री दास यांनी सह-दिग्दर्शित केलेला 'शॅडोबॉक्स' हा बंगाली भाषेतील नाट्यपट असून, त्यांचे हे दिग्दर्शकीय पदार्पण आहे.

महिला दिग्दर्शकांची संख्या वाढते ही आनंदाची बाब

चित्रपट क्षेत्रात महिला दिग्दर्शकांची संख्या वाढत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. येत्या काळात आणि पुढील वर्षांत ही संख्या अधिक वाढेल, अशी मला आशा आहे, असे पिंच चित्रपटाच्या दिग्दर्शिका उत्तरा सिंग यांनी सांगितले, तर मराठी चित्रपटसृष्टीत महिलांची सर्जनशील उपस्थिती वाढणे गरजेचे आहे. भविष्यात विविध महिला कलाकार आणि तांत्रिक सहकाऱ्यांसोबत एकत्रितपणे काम करण्याची माझी इच्छा आहे, असे तिघी चित्रपटाच्या दिग्दर्शिका जिजीविशा काळे यांनी सांगितले.

## नाट्यस्पर्धेमुळे मोबाईलपासून दूर जाऊन मुले व्यक्त होत आहेत-डॉ. दिलीप शेठ

**पुणे । प्रतिनिधी**

मोबाईलमध्ये गर्क असलेली मुले त्यापासून दूर जाऊन नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून स्वत:ला व्यक्त करीत आहेत. त्यांना दिलेली भूमिका उत्तम रितीने सादर करीत असतानाच सहजीवन, इतरांशी जुळवून घेण्याची सवय यातून ते उत्तम नागरिक म्हणून घडतील, असे मत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कलावर्धिनीचे अध्यक्ष डॉ. दिलीप शेठ यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्रीय कलोपासक आणि नाट्यसंस्कार कला अकादमीतर्फे भालबा केळकर नाटिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम गुरुवारी (दि. १५) भरत नाट्यमंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी डॉ. शेठ बोलत होते. महाराष्ट्रीय कलोपासकचे उपाध्यक्ष डॉ. सुहास जोशी, नाट्य संस्कार कला अकादमीचे अध्यक्ष प्रकाश पारखी, मकरंद केळकर, स्पर्धेचे परीक्षक अरविंद सीतापुरे, राजश्री राजवाडे-काळे, वंदना गरगटे उपस्थित होते. पारितोषिक वितरणाच्या पूर्वी स्पर्धेतील विजेत्या नाटिकांचे सादरीकरण झाले. विद्यार्थ्यांनी पारितोषिक स्वीकारताच एकच जल्लोष करीत आनंद व्यक्त केला. प्रकाश पारखी म्हणाले, मुलांना आनंद मिळावा म्हणून भालबा केळकर नाटिका स्पर्धा सुरू करण्यात आली. या स्पर्धांमधून मुलांचा व्यक्तिमत्व विकास होत असून त्यांना व्यक्त होण्याचे साधन उपलब्ध होत आहे. निकालपत्राचे वाचन ड. राजेंद्र ठाकूरदेसाई यांनी केले तर अवंती लोहकरे यांनी सूत्रसंचालन केले. अभिजित देशपांडे यांनी आभार मानले. मुलांमधील चमक आणि कौशल्य फुलविण्याचे कार्य जसे भालबा केळकर नाटिका स्पर्धेच्या माध्यमातून होत आहे त्याचप्रमाणे त्यांचा व्यक्तिमत्व विकासही घडत आहे. स्पर्धेत असणारी शिस्त मुलांची उत्तम जडणघडण करीत त्यांना आयुष्याच्या प्रत्येक क्षणी भान ठेवण्याचे शिक्षण आणि संस्कारांची शिदोरी देईल, असे डॉ. शेठ म्हणाले.

## धनकवडीत कुलूप तोडून एक लाखांची चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

धनकवडी परिसरात एका बंद सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी एक लाख रुपयांची रोकड चोरी केली. ही घटना १२ ते १४ डिसेंबर दरम्यानच्या कालावधीत घडली आहे.

याबाबत संजय सदाशिव दिघे (वय ५५, रा. राजमुद्रा सोसायटी, ओंकार पार्क इमारत, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांकडून चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी धनकवडीतील राजमुद्रा सोसायटीत राहायला आहेत. १२ जानेवारी रोजी मध्यरात्री चोरट्यांनी त्यांच्या सदनिकेचे कुलूप तोडले व चोरट्यांनी दिघे यांच्या सदनिकेत प्रवेश केला. शयनगृहातील कपाटावरील मोकळ्या जागेत दिघे यांनी एका पिशवीत एक लाखांची रोकड ठेवली होती. चोरट्यांनी कपाटावर ठेवलेली पिशवी चोरून नेली. सहायक पोलिस फौजदार बापू खुटवड तपास करत आहेत.

## भाजपच्या विजयानंतर मुरलीधर मोहोळ यांची पहिली मोठी घोषणा; शहराचा चेहरामोहरा बदलणार?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणेकरांनी भाजपला मोठ्या प्रमाणात पाठिंबा देत उमेदवार निवडून दिल्याबद्दल मी सर्व पुणेकरांचे मनापासून आभार मानतो. मतदान करताना पुणेकरांनी शहराच्या विकासाला, प्रगतीला आणि भावी पिढीच्या उज्ज्वल भविष्याला प्राधान्य दिले. हीच भावना लक्षात घेऊन आम्ही सत्ता केवळ उपभोगण्यासाठी नव्हे, तर पुणेकरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी जबाबदारीने काम करू, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री व पुण्याचे निवडणूक प्रभारी मुरलीधर मोहोळ यांनी केले.




या वेळी मंत्री चंद्रकांत पाटील, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.पत्रकारांशी बोलताना मोहोळ म्हणाले, की भाजपने जाहीरनाम्याच्या माध्यमातून पुणेकरांसमोर मांडलेले संकल्पपत्र पूर्ण करण्याचे भान आम्हाला आहे. पुढील पाच वर्षांत विकासकामे, पायाभूत सुविधा आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत देशभरात झालेल्या विकासाचा परिणाम पुण्यातही स्पष्टपणे दिसून येतो. मेट्रो प्रकल्प, चांदणी चौकाचा विकास, तसेच विविध कामांसाठी मिळालेल्या निधीमुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पुण्याशी संबंधित अनेक प्रश्न शासनदरबारी मार्गी लावले. मागील पाच वर्षांत महापालिकेत असताना भाजपने केलेली विकासकामे जनतेसमोर मांडली, तसेच मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०४७ पर्यंत पुण्याचा विकास कसा करायचा, याचे दूरदृष्टीपूर्ण व्हिजन नागरिकांसमोर ठेवण्यात आले. हे विचार पुणेकरांना पटल्याने त्यांनी पुन्हा भाजपवर विश्वास दाखवला, असे मोहोळ म्हणाले.

## शिरूरमध्ये ७ हजारांची लाच घेताना महिला तलाठी जाळ्यात; महसूल विभागात खळबळ

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शिरसगाव काटा सजातील महिला ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) प्रमीला नागेश वानखेडे (४४) यांना ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (-उइ) रंगेहाथ अटक केली. वडिलांच्या जमिनीचा पंचनामा तक्रारदाराच्या बाजूने करून देण्यासाठी वानखेडे यांनी १० हजार रुपयांची मागणी केली होती, तडजोडीअंती ७ हजार रुपये घेताना ही कारवाई करण्यात आली.




मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतल्यावर शुक्रवारी दुपारी २ वाजता न्हावरे-तळेगाव रोडवरील छत्रपती संभाजी चौक येथे सापळा रचण्यात आला. पंचासमक्ष लाच स्वीकारताना वानखेडे यांना पकडण्यात आले. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला असून, पोलीस उपअधीक्षक भारती मोरे पुढील तपास करत आहेत. या कारवाईमुळे शिरूरच्या महसूल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सध्या शिरूर तहसील कार्यालयाचा कारभार रामभरोसे असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. वारसाच्या नोंदी, खरेदी-विक्री आणि चूक दुरुस्तीच्या कामांसाठी नागरिकांना ६-७ महिने हेलपाटे मारावे लागत आहेत. निर्वी येथील ज्येष्ठ नागरिक अशोक सोनवणे यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, एका किरकोळ नाव दुरुस्तीसाठी मी सात महिन्यांपासून पायऱ्या झिजवत आहे, पण केवळ तारखा दिल्या जात आहेत. महसूल विभागातील या 'तारीख पे तारीख' संस्कृतीमुळे सामान्य जनता आणि शेतकरी मानसिक व आर्थिकदृष्ट्या भरडला जात असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## शेअर मार्केटचे आमिष ! वाघोली-मांजरीतील दोघांना तब्बल ७४ लाखांचा गंडा

**वाघोली । प्रतिनिधी**

शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये नफ्याच्या बहाण्याने वाघोली येथील एकाची २७ लाख ९२ हजारांची तर कमोडीटी, सेंचुरी (ऑईल, फॉरेक्स, मेटल, क्रिप्टो) गुंतवणुकीत नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचे समोर आले असून याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.पहिल्या प्रकरणात वाघोलीतील आयव्ही इस्टेट परिसरात राहणाऱ्या ४५ वर्षीय व्यक्तीला गुगलवर मनी कंट्रोल पहिले. त्यानंतर त्यांना व्हॉटसप ग्रुपमध्ये ड केले.

ग्रुपवर शेअर मार्केटची माहिती देऊन अप डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले. अपवर फायदा झाल्याचे दिसत असल्याने विश्वास ठेऊन वेळोवेळी २७ लाख ९२ हजार रुपये रुपये गुंतवले. पवर सुमारे २ कोटी २० लाखांचा फायदा झाल्याचे भासविण्यात आले. पैसे काढण्यासाठी प्रयत्न केला असता आणखी पैसे भरण्यास सांगण्यात आले.फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार देऊन वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात मांजरी खुर्द परिसरातील ४३ वर्षीय व्यक्तीला व्हाटसप मेसेज करून कमोडीटी, सेंचुरी मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास नफा मिळण्याचे आमिष दाखविले. व्यक्तीने मिळालेल्या लिंकद्वारे क्लिक करून डीटेल्स भरल्यानंतर ट्रेडिंग खाते तयार केले. एकाने व्यक्तीला कॉल करून बनावट फायद्याचे स्क्रीनशॉट पाठवून विश्वास संपादित केला. पैसे गुंतविल्यानंतर थोडा फायदा दिला. विश्वास बसल्याने व्यक्तीने विविध बँक खात्यात पैसे पाठवून ४६ लाख २२ हजार रुपये व्यक्तीने गुंतवले. त्याचे २ कोटी २० लाख फायदा झाल्याचे दिसत असताना पैसे काढून घेण्याचा प्रयत्न केला. आणखी टॅक्सचे ३४ लाख रुपये भरण्यास सांगण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार देऊन वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## वेल्ह्यात वंचित आणि आरपीआयची युती! जिल्हा परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर

**विंझर । प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकरीसाठी वेल्हे-राजगड तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. वेल्हे येथील 'हिल टॉप रिसॉर्ट' मध्ये वंचित बहुजन आघाडी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांची बैठक पार पडली. बैठकीत दोन्ही पक्षांची युती जाहीर केली. इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. प्रमुख उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. निवडणूक रिंगणात उतरणाऱ्या प्रमुख उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. बैठकीस वंचित बहुजन आघाडी व आरपीआयचे दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हा निरीक्षक उत्तम वनशिव, जिल्हाध्यक्ष संतोष लोखंडे, जिल्हा प्रवक्ते महेंद्र गायकवाड, उपाध्यक्ष महादेव खाटपे, सुनील कांबळे, सरचिटणीस अरुण कांबळे, रामभाऊ मरगळे, रामभाऊ इंगळे यांचा समावेश होता. वेल्हे तालुकाध्यक्ष बापू शिंदे (वंचित), कुंदन गंगावणे (तालुकाध्यक्ष आरपीआय), आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते डॉ. विश्वनाथ गायकवाड, विलास गायकवाड, विठ्ठल गायकवाड, अमित शिंदे, संतोष गायकवाड, सुरेशदादा गायकवाड, सुजल शिंदे, अमीर शेख (उपाध्यक्ष), सुरेश रणखांबे, अंकुश गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, बाजीराव रणखांबे, विझरचे उपसरपंच संतोष गायकवाड, कार्यकर्ते उपस्थित होते.तालुक्यातील वंचित आणि शोषित घटकांना न्याय देण्यासाठी ही युती भक्कमपणे निवडणुकीला सामोरे जाणार असून, सर्व सामान्य जनतेचा कौल आमच्या बाजूने असेल, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.



## आईच्या स्मृतीतून समाजसेवेचा दीप; काळे परिवाराचा प्रेरणादायी उपक्रम

**माळेगाव । प्रतिनिधी**

मातृप्रेमाचे ऋण फेडण्यासाठी आणि आईच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी उद्योजक रवींद्र उर्फ आबा काळे-देशमुख परिवाराने एक आदर्श पायंडा घालून दिला आहे. त्यांच्या मातोश्री दिवंगत चंद्रभागा शंकरराव काळे-देशमुख यांच्या स्मृती दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिर व रुग्णवाहिका लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी शारदानगर, बारामती येथे हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करून ती समाजसेवेसाठी अर्पण करण्यात आली.



'रुग्णवाहिका ठरेल आईच्या मायेचा आधार'

याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळून त्यांचे प्राण वाचावेत, या उदात्त उद्देशाने काळे परिवाराने ही रुग्णवाहिका समर्पित केली आहे. ही रुग्णवाहिका केवळ एक वाहन नसून, आपत्कालीन परिस्थितीत गरजू रुग्णांसाठी 'आईच्या मायेचा आधार' ठरेल. आईच्या आठवणींना अशा प्रकारे समाजसेवेची जोड देणे ही बाब कौतुकास्पद आहे. या स्मृती दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला युवक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळपासूनच रक्तदात्यांच्या रांगा लागल्या होत्या. दिवसभरात तब्बल २५० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. आईच्या निधनाचे दुःख कुरवाळत न बसता त्यांच्या आठवणींना समाजसेवेचे रूप देणे, हेच खऱ्या अर्थाने त्यांचे पूजन असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कांतीलाल शंकरराव काळे, रवींद्र शंकरराव काळे, सचिन नंदकुमार काळे, सागर चंद्रकांत काळे, सूरज सुरेश काळे, सुमित चंद्रकांत काळे, श्रीनिवास सुरेश काळे, विराज दत्तात्रय काळे, प्रतीक कांतीलाल काळे, ज्ञानव्ही रवींद्र काळे, मधुरा रवींद्र काळे तसेच नवजीवन ग्रुपच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. काळे परिवाराने समाजासमोर ठेवलेला हा सेवाभावी आदर्श सध्या परिसरात चर्चेचा आणि कौतुकाचा विषय ठरत आहे.

## वाघोली परिसरात अश्लील चाळे करणाऱ्या युगुलाला हटकल्याने वृद्धाला मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

सोसायटीच्या आवारात अश्लील चाळे करणाऱ्या युगुलाला हटकल्याने वृद्धाला हातातील लोखंडी कड्याने डोक्यात मारहाण करण्यात आल्याची घटना वाघोली परिसरात घडली. या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे वाघोलीतील एका सोसायटीत राहायला आहेत. शुक्रवारी (दि. १६ ) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ज्येष्ठ नागरिक सोसायटीच्या आवारातून निघाले होते. सोसायटीच्या परिसरात आरोपी आणि त्याची मैत्रीण थांबली होती. दोघेजण अश्लील चाळे करत असल्याचे ज्येष्ठ नागरिकाने पाहिले. ज्येष्ठ नागरिकाने आरोपी तरुणाला हटकले. सोसायटीच्या परिसरात अश्लील चाळे करु नका, असे ज्येष्ठ नागरिकाने तरुणाला सांगितले. या कारणावरुन तरुणाने त्यांना शिवीगाळ केली. काही वेळानंतर तरुणाने सोसायटीच्या आवारात प्रवेश केला. ज्येष्ठाला शिवीगाळ करून त्यांच्या डोक्यात हातातील लोखंडी कडे मारले. ज्येष्ठ नागरिकाच्या डोक्याला दुखापत झाली. पसार आलेल्या आरोपीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक वैजीनाथ केदार तपास करत आहेत.

## 'विद्यार्थ्यांनी जीवनात संधी शोधावी'; अर्हम फाउंडेशनच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे राज देशमुख यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने गॅदरिंग व बक्षीस समारंभ हा वर्षभराचे ताण कमी कमी करत असतो, हे करताना विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात शैक्षणिक व व्यावसायिक संधी शोधावी. संधीतूनच मोठी स्वप्न बघा तरच तुमचे ध्येयात यशस्वी व्हाल, असे अर्हम फाउंडेशनच्या कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुणे राज देशमुख यांनी सांगितले. अर्हम फाउंडेशन कार्यक्रमात अर्हम कला व वाणिज्य, अर्हम विधी, अर्हम कनिष्ठ, अर्हम माहिती तंत्रज्ञान, तसेच अर्हम एट्रिपलआयएस या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे राज देशमुख, अध्यक्ष चांगुल चळवळ संस्था व सन्मानीय अतिथी डॉ.सुदाम शेळके संचालक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या दीप प्रज्वलाने झाली.



यावेळी सन्मानीय अतिथी डॉ.सुदाम शेळके यांनी, खेळातून कुशलता कशी साधता येईल, शैक्षणिक करिअर करताना खेळ सुद्धा महत्त्वाचा आहे. भविष्यात करिअर करण्याची संधी सोडू नये असे विद्यार्थ्यांशी संवाद करताना सांगितले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शैलेश पगारिया, सचिव डॉ.आतिश चोरडिया, खजिनदार श्रीकांत पगारिया, आयटी प्रमुख स्वराज पगारिया तसेच विविध महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश भोसले, डॉ.मेहबुबसाब नगरबावडी, डॉ.नेहा पाटील, डॉ.अमन मिश्रा, प्रभा बटवाल यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी गणेश वंदना सादर करून केली. प्राचार्या प्रभा बटवाल यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थित यांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ नेहा पाटील यांनी अर्हम फाउंडेशन व इतर महाविद्यालयांचे तपशीलवार माहिती आपल्या प्रस्तावनेत दिली. फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.शैलेश पगारीया यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून पुणे, महाराष्ट्रसह विविध सात देशांत फाउंडेशनचे शैक्षणिक जाळे पसरले असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन उच्चभु पदांवर कार्यरत असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रात राज्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय असे १२ खेळाडूंना ट्रॉफी व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा ६० व शैक्षणिक गुणवत्तेत प्रावीन्यप्राप्त विविध महाविद्यालयांतर्गत ६५ विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. विविध गुणदर्शन कार्यक्रमात अनुक्रमे गायन व नृत्य प्रकारात गणेश वंदना, मायभवानी, मायकल-जॅक्सनब्रेक डान्स, लल्लाटी - भंडार, आईगिरी -नंदिनी, क्लासिकल, लावणी, दक्षिण-भारतीय, महाभारत, ढोली-तारो या गाण्यावर नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केली. यावेळी प्राचार्य डॉ. सतीश भोसले सेवानिवृत्त होत असल्याने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. अमन मिश्रा यांनी उपस्थित पाहुणे विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता, वंदे मातरम या गीताने झाली.

## पुण्यात 'या' चार पक्षांच्या शहराध्यक्षांचा दारुण पराभव

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेचा निकाल जाहीर झाला असून या निवडणुकीत भाजपने जोरदार मुसंडी मारत १६५ पैकी तब्बल १२० जागांवर विजय मिळवला आहे. भाजपच्या या एकहाती वर्चस्वाबरोबरच पुण्यात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. विशेषतः अजित पवार गटाला येथे सपशेल अपयश आले असून, अनेक दिग्गज नेत्यांना मतदारांनी पराभवाचा धक्का दिला आहे. या निवडणुकीत सहा प्रमुख राजकीय पक्षांचे शहराध्यक्ष थेट रिंगणात उतरले होते. मात्र, या 'हाय-प्रोफाईल' लढतींमध्ये मतदारांनी अनपेक्षित कौल देत चक्क चार बड्या पक्षांच्या शहराध्यक्षांना पराभूत केले आहे. भाजप आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष वगळता इतर सर्वांना पराभवाची चव चाखावी लागली आहे.

दोघांचा विजय, चौघांना दणका

भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी आपल्या प्रभागातून विजय मिळवत पक्षाचा गड कायम राखला. त्याचबरोबर काँग्रेसचे अनुभवी नेते व शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनीही विजय मिळवून पुण्यात काँग्रेसची उपस्थिती टिकवून ठेवली.

मात्र, ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे,



मनसेचे आक्रमक शहराध्यक्ष साईनाथ बाबर, उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे यांना मतदारांनी दारुण पराभवाचा धक्का दिला.

पुणे महापालिकेचा निकाल

पुणे महानगरपालिकेत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून १६५ पैकी १२० जागांवर विजय मिळवत एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. अजित पवार गटाला २९ जागा मिळाल्या असून तो दुसऱ्या क्रमांकावर आहे. काँग्रेसला १५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. शिवसेना ठाकरे गटाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले, तर मनसे आणि शिंदे गटाला एकही जागा मिळवता आलेली नाही.